नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

राजभाषा अधिनियम संशोधन विधेयक समितीच्या कार्याचे वृत्त ....

इतुकें आलो जवळ जवळ की ....

महंत श्री दत्तलक्षराज यांचे एक पत्र ....

एक दुर्देवी महान कलावंत ....

विदर्भ साहित्यसंमेलनाचे ठराव ....

शुद्धलेखन समितीचा वृत्तान्त ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रात, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कै० हरिभाऊ नेने

यांच्या स्मृतीस समर्पण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कै. हरि नारायण नेने यांना श्रद्धांजलि !

कालच्या 'केसरीं'त व आज रोजीं आलेल्या नागपूरच्या दोन्ही दैनिकांत हरिभाऊ नेने यांच्या अकालिक व अकल्पित मृत्यूची वार्ता वाचून अतिशय दुःख झालें. हरिभाऊंसारखे गाजावाजा न करतां देशाची व समाजाची सेवा करणारे लोक विरळा. हरिभाऊंनी नागपुरांत व अमरावतींत राहून विदर्भी-यांच्या शैक्षणिक उन्नतीकरिता केलेले उद्योग शिक्षक व लेखक या नात्याने फार महत्त्वाचे आहेत. त्यांची वाङ्मयसेवा ही वरच्या दर्जाची व विद्वन्मान्य झाली आहे. नागपुरांतील अनेक संस्थांशीं त्यांचा संबंध होता. त्या सर्वांना हरिभाऊ गेल्यामुळे आपला एक मोठा हितचिंतक व मार्गदर्शक गेला असें वाटणें स्वाभाविक आहे. हरिभाऊंची साधी राहणी व व्यासंगी वृत्ति ज्यांनी पाहिली, त्यांना ते एक नागपुरांत भारतीय संस्कृतीचे आदर्श पुरुष होते, असेंच वाटत होते.

त्यांच्यासारख्या श्रेष्ठ साहित्यसेवकाला विदर्भ साहित्यसंघाच्या अध्यक्षाचा मान बराचसा उशीरानेच मिळाला. त्यांच्या मृत्यूमुळे विदर्भ साहित्यसंघाचें अपरिमित नुकसान झालें आहे.

त्यांच्या विद्वत्तेमुळे व सौजन्यामुळे हरिभाऊंचा मित्रपरिवार फार मोठा, सर्व मराठी भाषिक मुलुखभर पसरलेला आहे. त्या सगळ्यांचीं अंतःकरणें हरिभाऊंच्या अकल्पित मृत्यूमुळे हळहळतील.

त्यांच्या मृत्यूने त्यांचीं मुलें व त्यांचे आप्तइष्ट यांचेवर मोठाच दुःखाचा प्रसंग ओढवला आहे. त्यांच्या दुःखांत आम्ही वाटेकरी आहोंत, एवढेंच त्यांना आम्ही सांगतों. त्यांचे चिरंजीवासमोर हरि-भाऊंचें उच्च चारित्र्याचें उदाहरण आहेच. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन आपली आयुष्ययात्रा करण्याची बुद्धि व शक्ति त्यांस परमेश्वर देवो. स्वर्गांत पापभीरु व निर्मलचरित सरस्वतीभक्तांचें जें उच्च स्थान असेल तें त्यांच्या कर्मानुसार हरिभाऊंच्या आत्म्यास प्राप्त होवो, ही सृष्टिनियंत्या भगवंतास प्रार्थना करून ही श्रद्धांजलि हरिभाऊंच्या आत्म्यास अर्पण करतों.

हरेरात्मने इयं श्रद्धांजलिरुपतिष्ठतु

पुणें, ता. २४-११-५४ — माधव श्रीहरि अणे

★ ★ ★ ★

सकाळ उजाडली आणि जों वर्तमानपत्रें बघतों तों आमचे हरीभाऊ नेने वारल्याची दुर्वार्ता वाचली ! मनाला धक्का बसला ! ते मूळचे इकडले. आम्ही, त्यांची ग्रॅज्युएट कुस्ती लावली होती. कदाचित १९१५-१६ साल असेल. पुढे ते मध्यप्रांतांत नोकरीसाठी गेले व तिकडचे झाले. ही जुनी ओळख तर होतीच परंतु ते जेव्हा महानुभावीय संशोधनाकडे वळले आणि ज्यावेळीं माडखोलकरांचे मदतीने मी नागपुरास संशोधन मंडळ स्थापण्याची यशस्वी खटपट केली त्यानंतर हरीभाऊ त्या संशोधन मंडळांत आले. महानुभावीय ग्रंथ जमविणें, वाचन करणें, त्यावर निबन्ध लिहिणें, ते छापणें इत्यादि कार्यें त्यांनी उत्कृष्टपणें पार पाडलीं. स्वभावाने शांत, कष्टाळू, अभ्यासी, निगर्वी असून हरीभाऊ रसिक आणि विनोदी होते. माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान पण आधी गेले. शरीर तालमीचें पण चपल. दुर्दैव ! असो. गेले ते गेले ! आम्हीही आता किती दिवस राहूं ! जाऊंच. तो क्रम आहे. होते तोंवर उत्कृष्ट सेवा करून गेले ! आता त्यांचें कार्य व परंपरा पुढे चालविणें हें तरुणपिढीचें कर्तव्य आहे. कृपा करून त्यांचे घरीं जाऊन माझा दुखवटा कळवावा. बरोबरीचीं माणसें जात चाललीं म्हणजे एक पर्व संपलें ! कोणचा दुसरा पडदा उघडतो पाहूं. आम्ही सावध आहोंत. कामें चालू घडीला कोण घेतो ?

पुणें, ता. २३-११-५४ — दत्तो वामन पोतदार

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्भ साहित्य संघाचें मुखपत्र आठव्या वर्षाचा

ुगवाणी

एप्रिल १९५३

भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
३७३९७
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०.२.९४
C.
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

卐

ष्या अंकांत

ाहित्य संघाचें १५ वें
र्षिक अधिवेशन
धिनियम संशोधन विधेयक
ीच्या कार्याचें वृत्त
ो जवळ जवळ कीं···
तालक्षराज यांचें एक पत्र
वीं महान् कलावंत
हित्य संमेलनाचे ठराव
समितीचा वृत्तान्त
सांघ : जानेवारी ५३
क्षांचे निकाल.



तपासले
१९९६

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कै. भाऊजी दप्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

प्रचारांतून गेलेल्या चांगल्या शब्दांचा कोश छापा

वऱ्हाडच्या मराठी भाषेंत पुणेरी मराठीच्या दृष्टीनें कांहीं भेद दिसले तरी ते सर्व अशुद्ध आहेत असें नाहीं. भाषा शुद्ध व अशुद्ध हा सगळा मानावा असा प्रकार आहे. कोल्हटकरांच्या एका नाटकांत दोन पात्रें बोलत असतात; एक आपल्या अशुद्ध भाषेविषयीं खंत दाखवितें, तेव्हा दुसरें त्याला म्हणतें [illegible] खरें, 'आपल्या भाषेचें व्याकरण' लिहिलें म्हणजे ती शुद्धच ठरली [illegible] हा निवळ विनोद नसून त्यांत सर्वस्वी सत्य असाच सिद्धांत [illegible] हे. पुणेरी मराठीहून वेगळे असे शब्द दिसले पण ते व जुन्या [illegible] वाङ्मयांत आढळून आले तर तें दूषण कीं भूषण समजावयाचें? माझ्या मतें तर जुन्या मराठी वाङ्मयांतील सूचक, सुंदर, अर्थपूर्ण असे शेंकडो शब्द प्रचारातून निघून गेले आहेत, ही प्रचलित मराठी वाङ्मयाची फार मोठी हानी होय. अनेक विषयावर लिहितांना योग्य चौरस शब्द न सांपडल्यानें आम्ही लेखक कोश [illegible] यांचामुळें कसें तरी थेडगुजरी, हेंगाडे, अवजड शब्द नवे बनवून काम उरकून घेत असतो. पण तेंच काम सुलभ रीतीनें करतील असे शेंकडो मराठी शब्द केवळ अज्ञानामुळें बाजूस पडले आहेत, हें [illegible] उदाहरणावरून लक्षांत आलें म्हणजे फार [illegible] वाटेल. केवळ अशा चांगल्या शब्दांचाच एखादा कोश छा[illegible]

—श्री. न. चिं. केळकर

(१९[illegible] सालीं यवतमाळच्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

पाहिजे; व साहित्यिक खेड्यांतील जीवनाशी समरस झाले पाहिजेत." अशी कळकळीची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

स्वागताध्यक्षांचें भाषण

त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. रामराव ठाकरे यांचें समयोचित असें सुंदर स्वागतपर भाषण झालें. त्यांनी खेड्यांत भरविण्यांत आलेल्या साहित्यसंमेलनाचें विशेषत्व सांगून साहित्यिकांकडून खेडुत बांधवांची काय अपेक्षा आहे याचें आपल्या भाषणांत विवेचन केलें.

अध्यक्षस्थान ग्रहण करण्याबद्दल सूचनापर भाषणें

नंतर प्रा. डॉ. पेंडसे यांनी अध्यक्षस्थान ग्रहण करावें म्हणून नागपूरचे प्रा. श्री. ना. बनहट्टी, सागरचे प्रा. दा. ल. अडोणी, चांद्याचे श्री. गो. बा पुल्लीवार, अमरावतीचे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, बुलढाणा जिल्ह्याचे श्री. द. रा गोमकाळे प्रभृतींची विनंति करणारीं भाषणें झालीं.

संमेलनाध्यक्षांचा निरनिराळ्या संस्थांतर्फे सत्कार

मग, डॉ. पेंडसे यांनी अध्यक्षस्थान ग्रहण केल्यावर प्रथम स्वागताध्यक्ष श्री. ठाकरे यांनी स्वागतमंडळातर्फे अध्यक्षांना कार्पाससूत्रमाला अर्पण केली. नंतर गुरुकुंज-आश्रम, अमरावती वि. सा. संघ शाखा, भंडारा वि. सा. संघ शाखा, महाराष्ट्र साहित्य परिषद म. प्र. शाखा, श्रीगुरुदेव प्रकाशन मंडळ, मराठी साहित्य सभा, नागपूर नाट्यमंडळ, वीणामंडळ, नागपूर, पेंच साहित्य, गोंडवन साहित्य संस्था आदि अनेक संस्थांतर्फे अध्यक्षांना कार्पाससूत्रें अर्पण करण्यांत येऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला.

संमेलनाला आलेले शुभ संदेश

त्यानंतर वि. सा. संघाचे चिटणीस श्री. ना. रा. शेंडे यांनी संमेलनास आलेले शुभ संदेश वाचून दाखविले.

मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या, भारतसरकारचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख, मुंबईसरकारचे मंत्री श्री. ग. दे. तपासे, भारत सरकारचे वार्तामंत्री डॉ. केसकर, मुंबईसरकारचे राजस्वमंत्री श्री. भाऊसाहेब हिरे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु पं. कुंजीलाल दुबे, म. प्र. कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. मा. दा. तुमपल्लीवार, पुण्याचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु म. म. द. वा. पोतदार व कार्यवाह श्री. चिं. ग. काशीकर, नागपूर विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री. उमावर मिश्र, मध्यप्रदेशाचे सरन्यायाधीश श्री. बी. पी. सिन्हा, पुण्याचे राजकवि य. दि. पेंढारकर, मुंबईचे श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर व आचार्य प्र. के. अत्रे, दिल्लीचे श्री. आ. रा. देशपांडे, मुंबई व्यवहारबुद्धि-मंडळाचे श्री. केदारनाथ, सांगलीचे कवि गिरीश, अमरावतीचे कविभूषण श्री. बळवंतराव खापर्डे, 'चित्रमय जगतचे' संपादक श्री रा. प्र. कानिटकर, 'वसंत' मासिकाचे (मुंबईचे) संपादक श्री. दत्तप्रसन्न काटदरे, यवतमाळचे श्री. वा. ना. देशपांडे, अकोल्याचे ममांसाभूषण श्री. पु. वा. साठे, बिलासपूरचे श्री. त्रिंबकराव देहनकर, नागपूरचे श्री. बाबूराव भोंसले, 'मुलांच्या मासिका'चे संपादक श्री. वा. रा. मोडक, हिंगणघाटचे श्री. नथमल लुराणा, 'सह्याद्रि' मासिकाचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पुणें) संपादक श्री. दि. वि. काळे, डिसा (गुजरात)चे सरदार भाऊसाहेब खळेकर देशमुख, गोंदियाचे श्री. नि. भा. कुठाळे, नागपूरचे श्री. गोविंद माधव फिनलेते प्रभृतींचे शुभ संदेश आले होते.

डॉ. पेंडसे यांचें अध्यक्षीय भाषण

त्यानंतर संमेलनाध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांचें सर्वस्पर्शी असें विचारपरिप्लुत अध्यक्षीय भाषण झालें. हें समग्र भाषण मागील महिन्याच्या (मार्च १९५३) 'युगवाणी'त प्रसिद्ध झालेंच आहे.

आश्रमाच्या चित्रपटाचा कार्यक्रम

अध्यक्षांच्या भाषणानंतर आमगांवचा गांधीस्मृतिदिन-सोहळा आणि 'मोझरी येथील विविध विभागांचें दर्शन' असे दोन सुंदर लघुचित्रपट दाखविण्यांत आले.

रामधूनचा आदर्श कार्यक्रम

रविवार ता. १५ मार्च हा संमेलनाचा दुसरा दिवस. या दिवशीं सूर्योदयाचे वेळीं 'रामधून' म्हणून एक जंगी मिरवणूक आश्रमाच्या रस्त्यारस्त्याने निघाली होती. या प्रसंगीं अन्नमंत्री श्री. दीनदयाळ गुप्त यांचे 'रामधूनचें महत्व' या विषयावर श्रवणीय भाषण झालें.

कार्यकारी मंडळाची सभा

याच दिवशीं सकाळीं ७॥ वा. संघाध्यक्ष डॉ. पेंडसे यांचे अध्यक्षतेखालीं गुरुकुंज येथील वि. सा. संघाच्या कार्यालयांत कार्यकारी मंडळाची सभा भरून खालील कामकाज झालें.

[१] श्री. ना. ग. डवीर यांचें दि. ३-३-५३ चें भवभूतिस्मारकासंबंधीचें पत्र सभेपुढे विचारार्थ ठेवण्यांत आलें. त्यावर अध्यक्षांनी दिलेल्या उत्तराचा खुलासा केला. "गोंदिया येथे जो कोणती जागा वि. सा संघाच्या शाखेला मिळेल तीवर व तेथील शाखेच्या मालमत्तेवर केंद्राचें स्वामित्व राहील" अशा आशयाचें पत्र अध्यक्षांनीं पाठविलें होतें.

[२] लोकभाषाप्रसार विभागाच्या संचालकाचें 'नॅशनल ॲकेडेमी ऑफ लेटर्स' संबंधीचें दि. १६-१-५३-चें पत्र व त्याबरोबर 'नॅशनल ॲकेडेमि ऑफ लेटर्स'च्या स्थापनेसंबंधी केन्द्रीय सरकारच्या ठरावाची एक प्रतिलिपि सूचना म्हणून पाठविण्यांत आली होती, ती सभेच्या निदर्शनास आणून दिली.

[३] मुंबईच्या श्रीमती उमादेवी यांचे महाराष्ट्रांतील संतवाङ्मयाचें 'पोलिश' भाषेंत भाषांतर करीत असल्याबद्दल व त्यासाठी कांही मदत मिळावी म्हणून पाठविलेलें पत्र सभेपुढे ठेवण्यांत येऊन, या बाबतींत वि. सा. संघ कांहीं मदत करूं शकत नसल्याचें ठरलें.

संतवाङ्मय-परिसंवाद

नंतर सकाळी ९-३०वा. प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं संतवाङ्मय-परिसंवाद झाला. महानुभाव वाङ्मयाबद्दल डॉ. वि. भि. कोलते, गांधीवादावर डॉ. जे. सी. कुमाराप्पा शिवाय कु० विमलाबाई ठकार व श्री. तुकारामजी गीताचार्य यांनीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषणें झाल्यानंतर, प्रा. न. र. फाटक यांचें संतवाङ्मय व संतांची कामगिरी यांचा चिकित्सक बुद्धीने आढावा घेणारें भाषण झालें.

शेवटचें खुलें अधिवेशन व मंजूर झालेले ठराव

सायंकाळीं ५ वा. शेवटच्या खुल्या अधिवेशनाला डॉ. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखालीं सुरुवात होऊन, विषयनियामक समितींत संमत झालेले—दिवंगताबद्दल दुखवटा, त्रैवार्षिक योजना, पारिभाषिक कोश, महारोग्यांच्या जीवनाचा अभ्यास, राजभाषा अधिनियम, राजभाषा अधिनियमासंबंधीं प्रचार-समिति, प्राथमिक शिक्षणाची पुनर्घटना आणि भूदानयज्ञाचा पुरस्कार असे आठ ठराव सर्वानुमते मंजूर झाले. हे आठ ठराव पृष्ठ २७ वर दिले आहेत.

आभारप्रदर्शन आणि खंजिरी भजन

या १५ व्या संमेलनाची समाप्ति राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या खंजिरी भजनाने झाली. तत्पूर्वी संमेलनाध्यक्ष डॉ. पेंडसे यांनी समारोपाचें विचारप्रवर्तक भाषण केल्यावर, सरचिटणीस श्री. ह. ना. नेने व उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांनी मार्मिक शब्दांत सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. आणि नंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचें मन मोहित करणारें खंजिरी-भजन होऊन संमेलन समाप्त झालें.

संघवार्ता

प्रा. न. र. फाटक यांची वि. सा. संघाला भेट व भाषण

मुंबईचे विख्यात साहित्यिक व संशोधक प्रा. न. र फाटक यांनी रविवार दि. २९-३-५३ रोजीं सायंकाळीं ६ वा. वि. सा. संघाच्या कार्यालयाला भेट दिली. त्यावेळी संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखालीं प्रा. फाटक यांचें 'सांस्कृतिक प्रगति' या विषयावर सुंदर भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत, महाभारतकालापासून आतापर्यंतच्या कालाचा आढावा घेऊन, "मूलतः मानव हा सुसंस्कृत, समाज टिकवून ठेवणाराच आहे व इतिहासाचा ओघाहे प्रगतकिडेच जात आहे" असें सांगितलें.

• • •

जुन्या कार्यकारी मंडळाची सभा

जुन्या कार्यकारी मंडळाची शेवटची सभा रविवार दि. ५-४-१९५३ रोजीं सकाळीं ८ वा. डॉ. श्री. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली. त्यावेळीं खालील कामकाज झालें.

१. दि. २१-१२-५२ आणि दि. १५-३-५३ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभांचे अहवाल मंजूर झाले.

२. अध्यक्षांनी शुद्धलेखनउपसमितीची साद्यंत माहिती सभेला निवेदन केली. त्यावर चर्चा होऊन खालील ठराव एकमताने मंजूर झाला:—

"अध्यक्षांनी पुनरुज्जीवित केलेल्या अकोट-संमेलनाने नेमलेल्या शुद्धलेखन समितीला हें कार्यकारी मंडळ मान्यता देत आहे; व या समितीचे निर्णय महाराष्ट्र साहित्यपरिषदेकडे विचारार्थ पाठविण्याला हें कार्यकारी मंडळ आपली संमति देत आहे."

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. सरचिटणीसांनी १९५२–५३ सालचा हिशेब सभेला सादर करून, कोणत्या खात्यावर किती व कसा खर्च झाला याची माहिती दिली. ज्या खात्यांत अधिक खर्च झाला तो योग्य असल्याने त्या अधिक खर्चास मान्यता देण्यांत आली. अंदाजपत्रकाच्या मानाने जमा–खर्च लक्षांत घेतां अधिक खर्च झाला नसल्याचें आढळून सभेने १९५२–५३ सालचा हिशेब मंजूर केला.

४. सर्व उपसमित्यांची माहिती सभेला सादर करण्यांत आली.

५. १९५३–५४ सालचें कच्चें अंदाजपत्रक सभेला सादर करण्यांत येऊन तें नवीन कार्यकारी मंडळाच्या सभेला सादर करावें असें ठरलें.

६. साधारण सभा नियम १० [ई] मध्ये दुरुस्ती सुचविणारा खालील ठराव संमत होऊन तो मंजूरीसाठी वार्षिक साधारण सभेपुढे ठेवावा असें ठरलें.

ठराव:—"साधारण सभा १० [ई] संघाच्या कोणत्याहि साधारण सभेची सूचना सभेच्या दिवसापूर्वी पंधरा दिवस अगोदर मध्यप्रदेशांतील प्रमुख दोन मराठी वृत्तपत्रांतून कार्यालयाने जाहीर करावी."

• • •

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा रविवार दि. ५–४–१९५३ रोजीं सकाळीं ९ वा. केन्द्रीय कार्यालयांत भरून, जुने संघाध्यक्ष डॉ. शं दा पेंडसे यांनी नवे संघाध्यक्ष प्रा. म. श्री. पंडित यांना अधिकारप्रदान केलें.

नवीन कार्यकारी मंडळाची पहिली सभा

नवीन कार्यकारी मंडळाची पहिली सभा रविवार दि. ५–४–१९५३ रोजीं सकाळीं ९–१५ वा. जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाच्या संयुक्त सभेनंतर लगेच केन्द्रीय कार्यालयांत भरली. नवीन संघाध्यक्ष प्रा. म. श्री. पंडित यांनी अध्यक्षस्थान ग्रहण केल्यानंतर घटना नियम ११ (आ) प्रमाणे पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी होऊन, खालील पदाधिकारी निवडून आले :

१. उपाध्यक्ष : श्री. पु. य. देशपांडे
कोशाध्यक्ष : प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे
सरचिटणीस : श्री. पां. बा. गडकरी
चिटणीस : (१) सौ. इंदुमती गंधे, नागपूर.
(२) श्री. ना. ग. डबीर, गोंदिया.
(३) श्री. म. बा. देवघरे, अमरावती.
संपादक, 'युगवाणी' : प्रा. श्री ना. बनहट्टी
संचालक, परीक्षा-समिति : प्रा. पां. कृ. सावळापूरकर

२. त्यानंतर कांही उपसमित्यांची निवडणूक झाली व कांही आहेत तशाच कायम राहतील असें ठरलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. १९५३-५४ सालच्या कच्च्या अंदाजपत्रकाला तात्पुरती मान्यता देण्यांत आली.

नवीन कार्यकारी मंडळाची दुसरी सभा

कार्यकारी मंडळाची दुसरी सभा रविवार दि. १२-८-१९५३ रोजीं सकाळीं ८-३० वा संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखालीं भरली.

१. दि. ५-४-५३ च्या जुन्या का. का. मंडळाच्या सभेचें, जुन्या व नव्या का. का. मंडळाच्या संयुक्त सभेचें व नवीन का. का. मंडळाच्या सभेचें अहवाल-वाचन झालें व हे तीनही अहवाल मंजूर झाले.

२. नंतर अध्यक्षांनी, नुकतेच निवडून आलेले सरचिटणीस श्री. पां. बा. गडकरी व 'युगवाणी'चे संपादक प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी आपल्या पदांचे दिलेले राजीनामे ते सभेला सादर करून कार्यकारी मंडळाने हे राजीनामे स्वीकार केले. त्यानंतर या रिकाम्या झालेल्या जागांसाठी श्री. ना. रा. शेंडे यांचें नांव सरचिटणीस-साठी व श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांचे नांव 'युगवाणी'चे संपादकासाठी सुचविण्यांत आलें. दुसरीं नांवें पुढें न आल्याने सरचिटणीस म्हणून श्री. ना. रा. शेंडे व 'युगवाणी'चे संपादक म्हणून श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे हे अविरोध निवडून आल्याचें अध्यक्षांनी जाहीर केलें.

३. वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेची वेगळी घटना नसल्यामुळें सध्या संघाच्या घटनेप्रमाणेच काम चालवावें, असें ठरलें.

५. घटना नि. नं. १९ [ऐ] प्रमाणे उपनियम करण्याचा कार्यकारी मंडळास अधिकार असल्यामुळे असे उपनियम करण्यासाठी कार्यकारी मंडळाने खालील उप-समिति नियुक्त केली :—

अध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे
सभासद : कार्यवाह, भंडारा शाखा
" अमरावती शाखा
" गोंदिया शाखा

५. वि. सा. संघाचें येतें १६ वें संमेलन खामगावला भरविण्याबद्दलचें निमंत्रण स्वीकारण्यांत आलें.

६. घटनाविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी खालील 'घटनाविषयक प्रश्न समिति' नियुक्त करण्यांत आली :

अध्यक्ष : न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति
आमंत्रक : श्री. द. रा. गोमकाळे
सभासद : श्री. पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजभाषा अधिनियम संशोधन विधेयक समितीच्या कार्याचे वृत्त

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमांत मराठी भाषेवर अन्याय करणारी जीं कलमें आहेत, यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी वि. सा. संघानें एक समिति नियुक्त केली होती. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे या समितीचे आमंत्रक निवडले गेले. राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती करण्याच्या दृष्टीनें समितीने विधानसभेचे कांही सदस्य आणि मराठी मंत्री यांच्याशीं चर्चा करून एक विधेयक तयार केलें, व तें विधानसभेच्या कांही सदस्यांकडे पाठविलें. त्याचबरोबर नागपूर प्रादेशिक कांग्रेसकमिटी आणि विदर्भ प्रादेशिक कांग्रेसकमिटी यांच्याकडेहि तें पाठविण्यांत आलें.

ता. ४ जानेवारी रोजीं डॉ. खरे यांच्या बंगल्यावर अ. भा. भाषावार प्रांत-रचनापरिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा डॉ. लंकासुंदरम् यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या सभेंत राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती सुचविणाऱ्या विधेयकाला पाठिंबा देणारा ठराव मान्य करण्यांत आला.

विधानसभेच्या सदस्यांपैकी नागपूर शहराचे प्रतिनिधि श्री. विनायकराव चनगोले, भंडारा जिल्ह्यांतील श्री. राम लांजेवार आणि श्री. तिरपुडे, सावनेर मतदारसंघाचे प्रतिनिधि श्री. नरेंद्र तिडके या कांग्रेससदस्यांनीं आणि जळगांव मतदार संघातर्फे विधानसभेचे सदस्य शेतकरी-कामकरी पक्षाचे श्री. का. रा. पाटील यांनीं रीतसर संशोधन विधेयक विधानसभेंत मांडण्याची विधानसभेच्या कार्यालयाकडे सूचनाहि दिली.

श्री. रा. कृ. पाटील, श्री. पु. का. देशमुख, श्री. ब्रिजलाल बियाणी, श्री. मा. सा. कन्नमवार, आणि श्री. दीनदयाल गुप्त या मराठी भागांतील मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना वि. सा. संघाची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करण्यांत आला. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सचिटणीस श्री. श्रीमन्नारायण अग्रवाल यांच्याशींहि संघाची बाजू मांडण्याच्या दृष्टीनें पत्रव्यवहार व प्रत्यक्ष चर्चा करण्यांत आली. सर्वांनीं वि. सा. संघाची बाजू सहानुभूतिपूर्वक समजाऊन घेतली; व शक्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले. आचार्य विनोबा भावे आणि श्री. शंकरराव देव यांनाहि संघाची बाजू आचार्य धर्माधिकारी यांच्यामार्फत कळविण्यांत आली.

यानंतर एक 'मेमोरियल' तयार करण्यांत येऊन त्याच्या इंग्रजी आणि मराठी प्रती विधानसभेच्या सर्व सदस्यांना वाटण्यांत आल्या.

यानंतर विधानसभेंतील कांग्रेस पक्षाची जी सभा झाली, तींत मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनी राजभाषा अधिनियमांत मराठी भाषी लोकांना अन्याय करणारीं जीं कलमें आहेत, तीं दुरुस्त करण्याचे आश्वासन दिलें.

यानंतर पं. रविशंकर शुक्ल आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भेट झाली; व ता. १७ मार्च रोजीं वि. सा. संघातर्फे शिष्टमंडळानें भेट घेण्याचा दिवस निश्चित करण्यांत आला.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता. १७ मार्च रोजीं सायं. ६॥ वा. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मा. दा. पेंडसे यांच्या नेतृत्वाखालीं राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती सुचविण्याकरिता इसोने सरकारला विनंती करण्यासाठीं मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांना वि. सा. संघाचे शिष्टमंडळ भेटलें. त्यांत वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, मध्यप्रदेश फॉरवर्ड ब्लॉकचे अध्यक्ष श्री. रा. स. रुईकर, शेतकरी–कामकरी पक्षाचे सहकार्यवाह आणि विधानसभेचे जळगांव मतदार संघातर्फेचे सदस्य श्री. काशीराव रायभान पाटील, नागपूर शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनचे अध्यक्ष श्री. स. म. मेश्राम, कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य श्री. एस. चौथमल, मध्यप्रदेश फॉरवर्ड ब्लॉकचे मंत्री श्री. म. मा पौनीकर, 'तरुणभारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष श्री. श्री. ना. बनहट्टी आणि महाविदर्भ सभेचे कार्यवाह श्री. ए. श्री. पटवर्धन असे ११ सदस्य उपस्थित होते.

आणखी पांच प्रतिनिधि शिष्टमंडळा बरोबर येणार होते. पण त्यांना कांही अपरिहार्य कामामुळें उपस्थित राहतां आलें नसलें, तरी शिष्टमंडळ मुख्य मंत्र्यांना भेटून जें मत व्यक्त करील, त्याच्याशीं आपण सहमत असल्याचें त्यांनीं शिष्टमंडळाच्या नेत्याला कळविलें होते. ते प्रतिनिधि पुढीलप्रमाणें:—नागपूर प्रादेशिक कांग्रेसचे अध्यक्ष श्री. मा. दा. तुमपल्लीवार, विदर्भ प्रादेशिक कांग्रेसचे मंत्री श्री. प्र. ना. खोडे, मध्यप्रदेश स्वतंत्र मजूर पक्षाचे सरचिटणीस श्री. भाऊराव बोरकर, नागपूर भारतीय जनसंघाचे अध्यक्ष श्री. जाल गिमी आणि नागपूर हिंदुमहासभेचे श्री. चलपे.

मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनीं शिष्टमंडळाचे म्हणणे तपशीलवार ऐकून घेतले व मराठी जनतेला अन्याय होणार नाहीं व राजभाषा अधिनियमांतील कलम ४ मध्यें मराठी भाषेचाहि समावेश करण्यांत येईल असे आश्वासन दिलें. त्याचप्रमाणें वेळोवेळीं ज्या अडचणी उपस्थित होतील, त्या दूर करण्यासाठीं विचार-विनिमय करण्याचेंहि कबूल केलें आहे. शिष्टमंडळाबरोबर चर्चा करतांना राजभाषा अधिनियमाच्या प्रत्येक कलमाची साधक बाधक चर्चा मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनीं खुल्या दिलाने केली.

ता. १५ ऑगष्ट १९५३ पासून मध्यप्रदेशाचा राज्यकारभार इंग्रजी ऐवजी मराठी व हिंदी भाषांतून करण्यापूर्वी अधिनियमांत कशी दुरुस्ती करण्यांत येणार आहे, हें पुढच्या विधान सभेच्या अधिवेशनाचे वेळीं कळून येईल.

निवेदन

१. मध्यप्रदेश राज्यविधान सभेने, 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५०' या नांवाने ओळखला जाणारा कायदा पास केला. 'मध्यप्रदेश राज्याच्या सरकारी कामासाठी वापरण्याकरितां हिंदी व मराठी या भाषा स्वीकारण्याची तरतूद करण्यासाठी' हा कायदा पास करण्यांत आला. [कायद्याची प्रस्तावना परिशिष्ट क्र. १ मध्ये पहावी.]

२. मध्यप्रदेश राज्यांतील बहुसंख्य लोकांकडून बोलल्या जाणाऱ्या अशा हिंदी व मराठी या दोन प्रमुख प्रादेशिक भाषा असल्यामुळे या दोन्ही भाषांना

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समान भूमिकेवर सारखाच सरकारी दर्जा प्राप्त करून देण्याची आवश्यकता वाटूं लागली. यासंबंधीच्या कायद्याची प्रस्तावना व कलम ३ यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल. दोन प्रमुख प्रादेशिक भाषा या नात्याने हिंदी व मराठी यांचा समान दर्जा गृहीत धरून त्यावरच हा कायदा आधारलेला होता. भारताच्या संविधानानुसार हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून उद्घोषित झाली आहे, म्हणून हिंदीला राजभाषेचा दर्जा प्राप्त करून देणें हा या कायद्याचा हेतु नव्हता.

म्हणून मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५० या कायद्याकडे, या प्रदेशाच्या दोन प्रादेशिक भाषा या नात्याने, हिंदी व मराठी यांना राजभाषांचा दर्जा प्राप्त करून देणारा कायदा अशा दृष्टीनेच पाहिलें पाहिजे.

मराठी भाषेला होणारा संभाव्य अन्याय टाळण्याच्या हेतूने मध्यप्रदेशांतील मराठीभाषी लोकांची सर्वांत प्रातिनिधिक संस्था या नात्याने विदर्भ साहित्य संघाने या कायद्यांत कांही संशोधनें सुचविलीं होतीं व मराठीभाषी विधानसभा–सदस्यांनी १९५१ मध्ये एका संशोधन विधेयकाची औपचारिक सूचनाहि दिली होती. परंतु दुर्दैवाने, वेळेच्या अभावामुळे, हें विधेयक विधानसभेला विचारांत घेतां आलें नाही. कायद्यांत संशोधनें सुचविण्यापूर्वी विदर्भ साहित्यसंघाने, आपला दृष्टिकोन समजावून सांगण्याच्या हेतूने, एक शिष्टमंडळ मध्यप्रदेश सरकारकडे नेलें होतें. आणि त्याच्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल, असें आश्वासनहि या शिष्टमंडळाला मिळालें होतें.

३. विदर्भ साहित्यसंघाने नंतर संशोधन विधेयकाचा एक दुरुस्त मसुदा तयार केला. या संशोधन विधेयकाची सूचना कांही मराठीभाषी विधानसभा सदस्यांनी दिली. आणि आज हें संशोधन विधेयक विधानसभेच्या अंदाजपत्रकी (आयव्ययक) अधिवेशनाच्या कार्यक्रमपत्रिकेवर आहे. (या विधेयकाची प्रत परिशिष्ट क्र. २ म्हणून सोबत जोडली आहे.)

४. आम्हाला असें खात्रीपूर्वक कळलें आहे की, मध्यप्रदेश सरकार आणि हिंदीभाषी महाकोशलस्थ सदस्यांच्या बहुसंख्येच्या वर्चस्वाखाली असलेला विधानसभेंतील कॉंग्रेसपक्ष हे या संशोधनविधेयकाची गळचेपी करण्याचा व पूर्वीचाच कायदा जारी ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. मध्यप्रदेशाचे प्रधानमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनी कांही दिवसापूर्वी असें जाहीर केलें की, 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५०' हा कायदा १५ ऑगस्ट १९५३ पासून अंमलांत आणण्यांत येईल. या कायद्यांत नमूद केल्याप्रमाणे अधिसूचना काढण्याबद्दल सरकार सध्या विचारहि करीत आहे. आणि ही अधिसूचना संशोधन विधेयकाकडे मुळीच लक्ष न देतां केव्हांहि काढण्यांत येईल असा रंग दिसत आहे.

५. संशोधनविधेयकांत सुचविल्याप्रमाणे मूळ कायद्यांत फरक न करता जर ही अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल, तर एक अतिशय गंभीर परिस्थिति निर्माण होईल. आणि मध्यप्रदेश सरकार व या राज्यांतील कॉंग्रेस पक्ष यांना ही परिस्थिति आटोक्यांत ठेवणें अत्यंत कठीण होऊन बसेल. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे की, मध्यप्रदेश हें द्विभाषी राज्य असतांनाहि हिंदी व मराठीभाषी जनतेमधील संबंध हे आजवर स्नेहाचे व जिव्हाळ्याचे असेच राहिले आहेत. आणि विदर्भ
५१ साहित्यसंघ व हिंदी साहित्यसंमेलन यांच्या पुढाऱ्यांनी हे स्नेहसंबंध वाढविण्याचेच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतत प्रयत्न केले आहेत. तसेंच या राज्यांत भाषावेडाचा संघर्ष निर्माण होऊं नये यासाठी विदर्भसाहित्यसंघानें दक्षतेनें कार्य केलें आहे. हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना दोन प्रमुख प्रादेशिक भाषा या नात्यानें समान दर्जा देण्याचें तत्त्व आजवर कटाक्षानें पाळलें जात होतें, म्हणूनच हें करणें त्यांना शक्य झालें. पण आता जर यासंबंधीच्या कायद्यांत सुचविलेलें संशोधन न करतां सरकारनें अधिसूचना प्रसृत केली, तर मात्र या मूळ तात्त्विक भूमिकेला जबरदस्त धक्का बसल्यावाचून राहणार नाही.

६. संशोधन विधेयकाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास हें सहज दिसून येईल की, या विधेयकांत सुचविल्याप्रमाणे कायद्यांत जर बदल केला गेला नाही, तर मराठीला समान दर्जा मिळणें शक्य होणार नाही. या कायद्याच्या कलम ४ मध्ये नमूद केलेल्या महत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतींत राजभाषा या दृष्टीनें मराठीला अजिबात वगळण्यांत आलें आहे. परंतु कायद्याच्या प्रस्तावनेंत आणि कलम ३ मध्ये असें स्पष्ट जाहीर केलें गेलें आहे की, "हिंदी व मराठी या सर्व कामांसाठी या राज्याच्या राजभाषा मानल्या जातील." अशा तऱ्हेनें ह्या कायद्यांतील कलमें परस्पर विसंगत आहेत. या विसंगतींतून भयानक परिस्थिति निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून मध्यप्रदेशराज्यांतील दोन प्रमुख प्रादेशिक भाषा या नात्यानें हिंदी व मराठी यांना समान दर्जा प्राप्त करून देण्याचा या कायद्यामागील जो मूळ हेतु होता, तो हेतु व कायद्यांतील विसंगति या दोन्ही गोष्टी लक्षांत घेतां, मुख्य मंत्र्यांनी जाहीर केल्या-प्रमाणें अधिसूचना काढून हा कायदा १५ ऑगस्ट १९५३ पासून अंमलांत आणण्याची घोषणा करण्यापूर्वी, संशोधन विधेयकांत सुचविल्याप्रमाणें कायद्यांत बदल करणें हें मध्यप्रदेश सरकारचें कर्तव्य ठरतें.

७. वर सुचविल्याप्रमाणें बदल न करतां हा कायदा जर तसाच अंमलांत आणला गेला, तर मराठी भाषेला केवढा मोठा अन्याय होईल, त्याची कल्पना पुढील गोष्टींवरून स्पष्ट होईल.

[अ] मध्यप्रदेशाच्या २२ जिल्ह्यांपैकी ७५, ९७, ०३८ लोकसंख्येचे ८ जिल्हे संपूर्णपणें मराठीभाषी आहेत. तसेंच कांही हिंदीभाषी जिल्ह्यांत बहुसंख्य मराठी-भाषीयांच्या कांही तहसिली आहेत. हिंदीभाषी जिल्ह्यांत समाविष्ट केल्या गेलेल्या बहुसंख्य मराठीभाषी तहसिलींची लोकसंख्या ९,६७,७३० एवढी आहे. याप्रमाणे मध्यप्रदेशांतील मराठीभाषी लोकांची संख्या एकूण ८५,६४,७६८ एवढी आहे.

[ब] पूर्वीच्या बस्तर संस्थानांत किंवा आजच्या बस्तर जिल्ह्यांत प्रामुख्यानें आदीवासींची वस्ती आहे. त्यांची बोलभाषा ही मराठीपासूनच निर्माण झालेली व मराठीला बरीच जवळची अशी आहे. या विभागाची लोकसंख्या ९,१३,७४६ आहे. ही लोकसंख्या जर इतर मराठीभाषी लोकसंख्येंत मिळविली, तर या राज्यांतील मराठीभाषी लोकांची एकूण लोकसंख्या ९४,७८,५१४ एवढी होते. ही लोकसंख्या मध्यप्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्मी आहे.

[क] महाकोशलमधील १४ जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या १,३६,४०,४९५ आहे. यांत हिंदीभाषी नसलेल्या अशा बस्तर जिल्ह्याचाहि समावेश केला गेला आहे. याशिवाय या १४ जिल्ह्यांत आदिवासी जनतेच्या विभागाचाहि समावेश करण्यांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

आला आहे. या आदिवासींच्या बोलभाषा हिंदीहून फार वेगळ्या व हिंदीशीं कोणतेंहि सादृश्य नसणाऱ्या अशा आहेत. म्हणून महाकोशलच्या १४ जिल्ह्यांच्या १, ३६,४०,४९५ या लोकसंख्येपैकीं जवळ जवळ शेकडा तीस इतकी लोकसंख्या आदिवासींची म्हणजे अहिंदीभाषी लोकांची आहे. ही लोकसंख्या वगळल्यास हिंदीभाषी लोकसंख्या ही मराठीभाषी लोकसंख्येच्या जवळजवळ बरोबरीची होते.

८. वर दिलेल्या गोष्टींवरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, जर मध्यप्रदेशाच्या राजभाषेसंबंधानें आहे त्या परिस्थितींत बदल करावयाचा झाला, तर तो एकाच तत्त्वावर करतां येईल. राज्याच्या सर्व व्यवहारांसाठीं हिंदी व मराठी यांना राजभाषा म्हणून समान दर्जा देणें हें तें तत्त्व होय. आणि 'राजभाषा अधिनियम १९५०' ह्या कायद्यांत वर सुचविल्याप्रमाणें दुरुस्ती केल्याशिवाय हें होणें शक्य नाही.

९. पण जर मध्यप्रदेश सरकारनें अगोदर ठरविल्याप्रमाणे 'राजभाषा अधिनियम १९५०' हा कायदा अधिसूचना काढून अंमलांत आणला, तर याचा परिणाम असा होईल कीं राजभाषा अधिनियमाच्या कलम ४ मध्ये नमूद केलेल्या व्यवहारासाठीं व राज्यसचिवालयांतील व्यवहारासाठीं या द्विभाषी राज्याचें रूपांतर एकभाषी राज्यांत होईल. यामुळे मध्यप्रदेशांतील या दोन प्रमुख प्रादेशिक भाषांमधील समतोलतेवर फार मोठा आघात होईल. आणि या परिस्थितींत भाषावेडानें अंध झालेल्यांना व विध्वंसक शक्तींना हिंदी भाषा व हिंदी लोक यांच्या द्वेषावर आधारलेल्या फुटीर चळवळींना भडकविण्याचें एक साधनच मिळेल. या निवेदनावर सह्या करणाऱ्यांचें असें मत आहे कीं, सध्याच्या मध्यप्रदेशांतील शांततेच्या व स्नेहभावाच्या वातावरणांत अशा तऱ्हेची दुर्दैवी व खेदजनक घटना कांहीहि करून टाळली पाहिजे. आणि अशी घटना टाळायची झाल्यास एकच मार्ग आहे. तो म्हणजे सूचित संशोधनविधेयकावर मध्यप्रदेश विधानसभेचा व सरकारचा विचार होईपर्यंत 'राजभाषा अधिनियम १९५०' या कायद्याची अंमलबजावणी तहकूब करणें हाच होय.

[१] शं. दा. पेंडसे,
एम्. ए., एम. ओ. एल्., पीएच्. डी.
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ

[२] पु. य. देशपांडे, एम्.ए.एल्एल्. बी.
संपादक, "नागपुर टाइम्स"

[३] अनसूयाबाई काळे
सभासद, हाऊस आफ दी पीपल

[४] तारा प्रधान, एम्.ए.एल्एल्.बी.
अध्यक्ष, गडकरी स्मारक समिति.

[५] पूर्णचंद्र गो. बुटी, बँकर आणि उद्योगपती

[६] ग. त्र्यं. माडखोलकर,
संपादक, "तरुण भारत"

[७] पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,
संपादक "महाराष्ट्र"

[८] ए. श्री. पटवर्धन,
कार्यवाह, महाविदर्भसभा.

[९] बा. कृ. चोरघडे, एम्. ए. बी. टी.
संपादक, 'युगवाणी'
व्हाइस प्रिन्सिपल, कॉमर्स कॉलेज, नागपूर.

[१०] श्री. ना. बनहट्टी, एम.ए.एल्एल्.बी.

[११] म. स. मेश्राम
बी. ए. एल्एल्. बी. ॲडव्होकेट,
अध्यक्ष, शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन

[१२] भाऊराव बोरकर, सरचिटणीस,
स्वतंत्र मजूरपक्ष, मध्यप्रदेश

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजभाषा विधेयक व त्याची दुरुस्ती

मध्यप्रदेश राजभाषा विधेयक आणि विदर्भ साहित्यसंघानें तयार केलेलें त्याचें संशोधन विधेयक अशी दोन्ही पुढे दिलीं आहेत. मूळ विधेयक प्रथम दिलें असून, संशोधन विधेयक नंतर दिलें आहे. विधेयकांचा मराठी अनुवाद हा अधिकृत सरकारी अनुवाद आहे.

मूळ विधेयक

मध्यप्रदेश अधिनियम १९५० चा २४ वा

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०

[प्रांतपतीची अनुमती दिनांक २७ आक्टोबर १९५० ला मिळाली; दिनांक ३ नोव्हेंबर १९५० च्या मध्यप्रदेश सूचनापत्रांत अनुमती प्रथम प्रसिद्ध करण्यांत आली]

मध्यप्रदेश राज्याकरितां राजभाषा जाहिर करण्यासाठी अधिनियम.

प्रस्तावना

ज्या अर्थी मध्यप्रदेश राज्याच्या कामासाठी वापरण्याकरितां हिंदी व मराठी या भाषा स्वीकारण्याची तरतूद करणें इष्ट आहे, त्या अर्थी या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे:—

लघु संज्ञा व व्याप्ति

१. [१] या अधिनियमास मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०, असें निर्देशावें.

[२] तो संपूर्ण मध्यप्रदेशास लागू आहे.

व्याख्या

२. विषयांत अगर संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसेल तर या अधिनियमांत "हिंदी" म्हणजे जिची लिपी देवनागरी आहे अशी हिंदी, आणि "मराठी" म्हणजे जिची लिपी बालबोधी आहे अशी मराठी.

राज्याच्या सरकारी कामासाठी राजभाषा

३. [१] यापुढे केलेल्या तरतुदीस पात्र राहून हिंदी आणि मराठी या सर्व कामासाठी ह्या राज्याच्या राजभाषा राहतील.

[२] अधिसूचनेंत निर्देशिलें असेल त्या कोणत्याहि प्रदेशांत आणि निर्देशिलें असेल त्या तारखेपासून निर्देशित केलें जाईल त्या सरकारी कामांकरिता हिंदी किंवा मराठी अथवा या दोन्ही भाषा वापरल्या जातील असें अधिसूचनेद्वारे फर्माविण्याचा राज्यसरकारास अधिकार आहे.

विधेयकें वगैरेंत वापरण्याची भाषा

४. [१] पुढील बाबींसाठी वापरण्याची भाषा ही राज्यसरकार त्यापैकी प्रत्येक बाबतींत अधिसूचनेद्वारें नेमून देईल त्या तारखेस व तेव्हांपासून हिंदी राहील—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[अ] राज्यविधानसभेंत सादर करावयाची सर्व विधेयकें व त्यासाठीं मांडावयाचीं सर्व संशोधनें.

[ब] राज्य विधानसभेनें संमत केलेले सर्व अधिनियम.

[क] भारतसंविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वयें जारी करावयाचे सर्व अध्यादेश.

[२] भारत संविधानान्वयें किंवा संसदेने अथवा राज्याच्या विधान मंडळाने केलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें राज्यसरकारनें काढलेले सर्व हुकूम नियम, नियमनें आणि पोटकानू.

• • •

संशोधन विधेयक

(१९५३ चीं ७, ८, ११ व २१ चीं विधेयकें)

मध्यप्रदेश विधेयक, १९५२ चें ७ वें

मध्यप्रदेश राजभाषा [संशोधन] विधेयक १९५३

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०, संशोधित करण्यासाठीं विधेयक १९५३

प्रस्तावना

१९५० चा २४

ज्या अर्थी मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०, हा पुढे दिलेल्या कारणांकरितां संशोधित करणें इष्ट आहे,

त्या अर्थी या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा

१. या अधिनियमास मध्यप्रदेश राजभाषा [संशोधन] अधिनियम, १९५३ असें उल्लेखावें.

१९५० चा अधिनियम २४, कलम ३ बदलून घालणें

१९५० चा २४

२. मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५० [यास यापुढे सदरहू अधिनियम असें निर्देशिलें आहे], याच्या कलम ३ ऐवजी पुढील कलम नमूद करावें. तें असें :—

राज्याच्या सरकारी कामासाठी राजभाषा

३. यापुढें केलेल्या तरतुदीस पात्र राहून हिंदी व मराठी ह्या सर्व कामांसाठीं या राज्याच्या राजभाषा राहतील.

मात्र राज्यसरकारला अधिसूचनेअन्वयें असा निर्देश देण्याचा अधिकार आहे की—

[१] प्राधान्येकरून हिंदीभाषी असलेल्या जिल्ह्यांत हिंदी भाषा

 [२] प्राधान्येकरून मराठीभाषी असलेल्या जिल्ह्यांत मराठी भाषा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[३] प्राधान्येकरून हिंदी किंवा मराठीभाषी म्हणून निश्चित करितां येत नाही किंवा अमुक प्रकारचे जिल्हे म्हणणें हें विवाद्य आहे अशा जिल्ह्यांत हिंदी व मराठी दोन्हीहि भाषा सर्व कामांसाठी राजभाषा म्हणून वापरण्यांत येतील.

१९५० चा अधिनियम २४ कलम ४ चें संशोधन

३. सदरहू अधिनियमाच्या कलम ४ मधील "वापरण्याची भाषा ही" या शद्वांऐवजी "वापरण्याच्या भाषा या" असे शद्व आणि "हिंदी राहील" या शद्वांऐवजी "हिंदी व मराठी राहतील" असे शद्व नमूद करावे.

उद्देश व कारणांचें निवेदन

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५० [१९५० चा २४], या अन्वये मराठीला समान दर्जा मिळणार नाही आणि अधिनियमांतील कलम ४ मध्ये निर्देशिलेल्या कामांसाठीं त्या कलमांतील उपबंधांत मराठी भाषेला मान्यता दिलेली नाही, अशी मराठीभाषी लोकांची भावना आहे. ही असमानता घालवावी आणि या अधिनियमाच्या कलम ३ [१] अन्वयें मध्यप्रदेश राज्यांत सर्व कामांसाठी राजभाषा म्हणून असलेल्या हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना समान मान्यता रहाणें निश्चित करावें, हा या सुचविलेल्या संशोधनांचा उद्देश आहे.

नागपूर ता.
८ फेब्रुवारी १९५३

राम लांजेवार, ना. स्वं. निरपुडे. वि. ज चनगोले,
का. रा. पाटील. नरेंद्र तिडके,
प्रभारी सदस्य

वाचकांस सूचना

युगवाणीबद्दल करावयाचा सर्व पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा अशी विनंती आहे.

संपादक 'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ कार्यालय
उत्तर अंबाझरी रोड, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाळ पांडे

इतुकें आलो जवळ जवळ कीं....

[मंगेश पाडगांवकर यांची वरील मथळ्याचीच
कविता ऐकून सुचलेले कांही विचार]

इतुके आलों जवळ जवळ की
जवळपणाला उरगुन गेलों
तरीहि आपण परस्परांहून
निराळेच हे किती राहिलों !
‘ मनें आपुलीं एक जहालीं
भिन्न शरीरें जरी ’ म्हणालों
प्रेमैक्याच्या मंद्र सुरांनी
अद्वैताचें गीत गायिलों ।
भुजाबंधनीं भान हरपतां,
अजाणतां, नकळत, पुटपुटलों
‘ नुरे निराळेपण अपणांला
पूर्णत्वानें एक जहालों ’ ।
परंतु होता आभासच तो—!
स्वप्नच केवळ निद्रेपुरतें !
धुंदींतुन शुद्धीवर येतां
अलगपणाची ओळख पटतें ।
अंतःकरणांच्या एकीची
वृथा वल्गना—वृथाच सखये
मजविषयीं तुज, तुजविषयीं मज
कधीच का गे शंका नाये !
उन्मादाची पिउन वारुणी
परस्परांचा अनुनय करण्या,
भोगासाठी, प्रेमैक्याच्या
बरळत असतो आपण थापा
‘ कसें टिकें तें प्रेम तरी मग ! ’
विचारशी ! सांगु कां खरें पण !
भविष्यांतली भोगापेक्षा
चालु ठेविते थापाडेपण !

तेंच बोलणें, तेंच सांगणें
हळूहळू कानीं कुजबुजणें
‘ विभिन्नता आपुली विरली ! ’
वास्तवांत पण भिन्नचें असणें !
कृष्ण निशेच्या कृष्ण कंवलीं
ऊबदार मस्तीची लज्जत
चाखत असतां, जरी विसरलों
पहांट, तरिही पहाट होतां
विसरुन जातों पूर्ण निशा अन्
दिवसामध्ये रमून जातों !
कुठे राहिली निशा ! कुठे अन्
स्वप्न—आपुलें तें ‘ चिरमीलन ’ !
मिठीमध्ये जें सखि ! वाटे कीं—
आपण नाही मुळी निराळे—
तितक्यापुरतें तें मर्यादित
नंतर आपण अपूं वेगळे !
तशाच तरुवेलीही बघ ह्या !
वृक्षाधारें वेली खुलते
हंसते फुलते झुलते डुलते
वृक्षालाहि शोभा देते
वृक्षहि खुलतो, मनीं हरखतो
अनिलाच्या सूरांत मिसळुनी
सूर, तृप्तिचें गीतहि गातो
त्या दोघांचें तें मधुमीलन
खरोखरच का असें चिरंतन !
जरी भासतें, जरी वाटतें !
तें तर सगळें तितक्यापुरतें !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विधिवश जर ती वेली मेली
करपुन केवळ काष्ठ राहिली
दुसऱ्या वेली वृक्ष वागवी
दिसे तरी तो तसाच सुंदर !
    उरे फक्त ती रुक्ष काटकी
    गळली नाही म्हणुन बिलगली
    त्या वेलीची करपुन गेली
    स्मृतीच केवळ ती उरलेली !
वेलीचें पण तसेंच आहे !
    वृक्ष जरी उन्मळून पडला
    वेलीलाहि बसे हादरा !
    ती भूमीवर लोळण घेते
    दुःखें विकलांगाही होते
    कधी कधी मृतप्रायहि होते
पण ! मेघाच्या पडतां धारा
    नवीन संजीवन तिज मिळतें
    नवीन फुटते तिला पालवी
    फोफावुन ती वाढुं लागते !

पुनरुज्जीवित ही नववेली
आसपासच्या कुण्या तरूचा
आधारास्तव आश्रय घेते
रुंमूं लागते ! फुलूं लागते !
तिथेच पडल्या, जुन्या तरूच्या
शुष्क जीर्ण खोडावर गळती
प्रातःकाळीं तिचीं आंसवें
आनंदाची ! नच दुःखाची !
म्हणून म्हणतों–!
    आतां सखि तूं पडताळुन
    तें चिरमीलन ! हें विभिन्नपण
    चिरऐक्याचें तें मधुगायन
    विभिन्नतेचें हें कटु रूदन
    अन् तेव्हां तुज येइल समजुन
    खरें ऐक्य कीं खरें अलगपण
इतुके आलों जवळजवळ कीं
जवळपणा बंधनसम भासे !
तरी ऐक्य हें क्षणिक आपुलें
स्थायी आणी भिन्नपण असे !

साहित्यिकाचा पत्रव्यवहार

• • • महंत श्री दत्तलक्षराज यांचें एक पत्र

प्रस्तुत पत्र देवदेवेश्वर संस्थानचे प्रसिद्ध; दिवंगत महंत श्री दत्तलक्षराज कवीश्वर यांनी माहूरहून डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांना ता. २७–४–१९२५ रोजीं लिहिलें आहे. श्री दत्तराज हे जन्माने आणि भाषेने पंजाबी असून त्यांचे शिक्षण आणि आरंभीचीं वर्षे, निवास पंजाबांतच झाला आहे. महानुभाव वाङ्मयाचा शोध आणि त्यांचा संग्रह यांत त्यांनी आयुष्य वेचलें. लोकमान्य टिळक, डॉ. भांडारकर, वि. ल. भावे इत्यादिकांना पंथविषयक आणि वाङ्मयविषयक माहिती यांनीच दिली. महानुभाव वाङ्मय पंथाबाहेर जाऊं नये, या नियमाचें कसोशीने पालन होत असे, पण तें वाङ्मय कोणासही सुलभ व्हावे, म्हणून तें छापून प्रसिद्ध करण्याकरतां त्यांनी लाहोर येथें दत्तप्रकाश छापखाना घातला होता, आणि स. १९०० च्या सुमारास लाहोर येथेंच, भगवद्गीतेवरील सोळाव्या शतकांतलि 'गोपाळदास' नांवाची मराठी गद्य टीका छापून प्रसिद्ध केली होती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महानुभाव वाङ्मयांत डॉ. देशपांडे यांचा प्रवेश व्हावयास महंत श्री दत्तलक्ष-राज आणि महंत हरिराज ऊर्फ गोपीराज बाबा यांचीच प्रामुख्याने मदत झाली. किंबहुना वऱ्हाड-नागपूर प्रांतांत महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनाचें आणि अभ्यासाचें केंद्र निर्माण झालें, याचें श्रेय या उभय महंतांच्याच सहकार्यास आहे.

'महानुभावीय मराठी वाङ्मय' हें पुस्तक लिहिण्यापूर्वी डॉ. देशपांडे यांनीं पंजाब, पेशावर, काश्मीर आणि शक्य झाल्यास काबूल पर्यंत त्या भागांत असलेल्या मठ-मंदिरांतून महानुभावीय ग्रंथांचा शोध करण्याकरिता प्रवासाची स. १९२५ मध्ये तयारी केली. तेव्हां महंत दत्तराज यांनी तिकडील मठाधिपति आणि महंत यांना या कार्यांत सहकार्य करण्याविषयीं पत्रें लिहिलीं, आणि त्याचवेळी त्या भागांत महानुभावीय मठ-मंदिरें कोठें कोठें आहेत, मठाधिपति महंत कोण कोण आहेत आणि कोठे कोठें ग्रंथ मिळण्याचा संभव आहे यासंबंधी माहिती व्हावी म्हणून मुद्दाम हें पत्र डॉ. आप्पासाहेब देशपांडे यांना लिहिलें होतें. या पत्रामुळे प्रवास सुखकर झाला आणि ग्रंथांच्या शोधाचें काम सुकर झालें.

पत्रांतील पूर्वार्धांत महानुभाव पंथ आणि वाङ्मय यासंबधाने २८ वर्षांपूर्वी महाराष्ट्रीय विद्वानांत काय समज होते, याचें चित्र रेखाटलें आहे, आणि उत्तरार्धांत शोधकार्यास उपयुक्त अशी माहिती दिली आहे. वरील सर्व भाग हल्लीं पाकिस्तानांत गेल्यामुळे हीं मठमंदिरें नामशेष झालीं आहेत; मठाधिपति, महंत, यांचे वास्तव्य-ही तेथें राहिलें नाहीं, आणि ग्रंथ संग्रहहि आज तेथें उरला नाही. त्यामुळे महानु-भावीय वाङ्मयाच्या इतिहासांत या पत्रास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासकांस त्याचा उपयोग व्हावा म्हणून, मराठी वाङ्मयाचें विदर्भांतील एकमेव नियतकालिक या नात्याने युगवाणींतून हें समग्र पत्र प्रसिद्ध करीत आहोंत. लेखक पंजाबी देशस्थ आहेत ही दृष्टि पुढे ठेवून त्यांच्या मराठी भाषेकडे पहावें.

[संपादक : युगवाणी]

★

संस्थान श्री दत्तात्रेय, देवदेवेश्वर, माहूर.

स्वस्ति श्रीमन् सकल सद्गुणाकर विद्वन्मूर्ति रा. रा. आप्पासाहेब वकील यां प्रति आणि सर्व घरमंडळी लहानथोर या प्रति बहुधा जयश्रीकृष्ण.

वि. आपण प्रेमपुर्वक 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' भाग ११ मूळ किंमतीस जो ग्रंथ पाठविण्याची मेहेरबानी केली याबद्दल आपले अत्यंत आभारी आहो व हिशोबाप्रमाणे आपले उरलेले रुपये भेटिअंती देता येतील. मात्र दुसरा भाग मागवावा.

आपणांस भेट म्हणून 'महानुभाव-महाराष्ट्र ग्रंथावली. कवि काव्य-सूची' प्रत, आणि 'वत्सहरण' प्रत १ पाठविली त्याचा स्वीकार करावा.

भारतांतर्गत मराठी भाषा बोलणारांची संख्या दोन कोटी असावी, त्यापैकी महानुभाव धार्मिक संन्यासी लोकांची संख्या सुमारे २५००० पर्यंत असावी. परंतु ग्रंथकार या नात्याने पाहु गेल्यास मराठी बोलणारापैकी अवघे कवि ८५०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' संत-कवि-काव्य सूचि ' कारांना निवडता आले. त्यांत चातुर्वर्णीय व अत्यंज यवनादिकांचाही समावेश केला गेला. परंतु महानुभाव धर्मानुयायी कविजनांची प्रथमचीच ' कवि काव्य-सूची 'मध्ये ६७५ ग्रंथकार व ५००० वरी ग्रंथांचा पत्ता लागला. तेव्हां महानुभाव आणि महानुभावेतर समाज संख्या मानाने अधिक ग्रंथनिर्माणकर्ते कोण ? यांचा विचारी मनुष्यांना तात्काळ उलगडा होतो. ज्याप्रमाणे ग्रंथ गौरवाने विद्वत्तेने महानुभाव श्रेष्ठ ठरतात त्याचप्रमाणे आद्य ग्रंथकार या नात्यानेहि श्रेष्ठ ठरतात. गद्य, पद्य, निर्यमक वृत्ते वा सयमक वृत्ते वा विविध वृत्ते म्हणजे मात्रागणवृत्तें व अक्षरगणवृत्तें मराठी भाषेत निर्माणकर्ते महानुभावच आहेत हे निर्विवादपणे कबूल करावे लागेल नां ? शिवाय व्याकरण व कोशकाराचा आद्यमानही मराठी भाषेपुरता तरि महानुभाव विद्वानाकडे आहे. परंतु हे सर्व कोणास ? जे शांत विचारी संशोधक त्यांस. एरवी हठाभिमाने पूर्वग्रहदूषित परोत्कर्ष असहिष्णु जनांस हे सर्वच त्याज्य भासणार. कारण त्यांनी दुसऱ्या समाजांस ग्रंथ कर्तृत्वाचा आद्यसन्मान दिला तर त्यांच्या स्वात्मप्रौढीची प्रतिष्ठा मग किती उरणार ? म्हणून ते भाषाशास्त्राचे नियमांस फेटाळून आद्यकवि मुकुंदराज आणि ज्ञानदेव यांसच मानणार. या दोपैकी जशी उच्च कोटीची भावार्थदीपिकेची भाषा आहे. तत्सादृश्य विवेकसिंधुची भाषा आहे काय ? ' महाराष्ट्र सारस्वत ' भाग १ पृ ३० यावर राजा कन्हरदेव जाधव=यादव देवगिरीकर यांचे भेटिची जी आख्यायिका म्हणून दिली आहे तींतील रुपे आणि विवेकसिंधूतील शब्दांची ठेवण व रुपे साम्यतेस येतील काय ? परंतु हठाभिमान तो श्रेष्ठ. अखिल महाराष्ट्र विद्वन्मान्य वर्गामध्यें पद्य ग्रंथ कर्तृत्वाचा मान श्री भास्कर कविश्वराचार्याकडे येतो. तसाच गद्य ग्रंथ कर्तृत्वाचा मान महिंद्र व्यासाकडे येतो. या दोहोंचे उतारे ' सारस्वतांत ' आलेले आहेत. ज्ञानेश्वरापूर्वी महानुभाव विद्वान व विदुषींचे ग्रंथांचे उतारे पाहून कांही संशोधक स्वात्मप्रौढीत गुंग असणाऱ्यांस रात्रौ निद्रा देखील येत नसेल. महानुभाव ग्रंथकारांना म्हणून कसें पाडावे या विवंचनेत ते असावेत. परंतु सत्याचा वाली परमेश्वर सदोदित असतो नां ?

वास्तविक पाहतां महात्मधर्म संस्थापकांनी जगांतील अनीतिचे उच्चाटणार्थी व परमेश्वरप्राप्त्यर्थी या मार्गाची अखिल मानवोपयोगी उदार तत्वावर मांडणी केली. व त्यावेळी असलेल्या अति तीव्र हिंसाकर्माचा त्याग करवितांना द्युत, मद्य, मांस, हिंसा, चौरी, व्यभिचार आणि अनेक ग्रामण्य देवतां भक्तिचा निषेध केला. तदनुरोधाने महात्माचार्य वर्गांनी आपल्या उपदेशक्रमाचा मार्ग आरंभिला. परंतु अनेक देवतांच्या नावावर अवैदिक देवतांचे बंड निर्माण करणाऱ्या वर्गांना व तदनुषंगीक देवतांच्या नांवे उदर भरणारे वर्गांना हे तत्व भयानक वाटले. व त्या सर्वांनी महात्मवर्गांचा छळ आरंभिला. एकवेळ जो द्वेषांकुर रुजला तो क्रमशः वृद्धिंच होत गेला. सत्य निवडून काढण्याच्या भानगडीत कोणीच पडला नाही. उदाहरणार्थ ' सारस्वत '-कारांना तरी महानुभाव हे चातुर्वर्ण्यव्यवस्था-विध्वंसक असावेत असा संशय आहेच. मात्र त्यांच्यापुढे शेकडो ग्रंथ असतां त्यांच्या मनामध्येंहि भ्रम असावाच कां ? महानुभावसमाजानी चातुर्वर्ण्यव्यवस्था नसावि असे कधीच मत प्रतिपादिले नाही. यदाकदाचित अघातास प्रत्याघात देतांना ' वज्रसूचिकोपनिषद ' – काराप्रमाणे एकाच वर्णाच्या जोखडाखाली मान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाकविण्याचे कोणत्याही मानवास कारण असे प्रतिपादिले असेल. मात्र चातुर्वर्ण्य-व्यवस्था मोडून सब गोलाकार-' जगन्नाथ का भात और सभी पसारे हात ' अशी अव्यवस्था कोणत्याही महात्म विद्वानांनी कोणत्याहि ग्रंथांत प्रतिपादिले नाही. स्वतः श्री चक्रधर स्वामींनी श्री नागदेवाचार्य यांस निरोपण करितांना सांगितले आहे की, ' चातुर्वर्ण चरेद्भैक्ष्यं मद्य मांस न सेवनम् ' अथवा ' चातुर्वर्ण चरेद्भैक्ष्यं या शास्त्रा अनुसरीजे ' म्हणजे यतिनी चातुर्वर्णिकगृही भिक्षा याचावी आणि चातुर्वर्णीक सच्छूद्रभावीक वर्गास दीक्षा द्यावी. परंतु तदंत्तरास न द्यावी. दिक्षार्थी-' राग द्वेष काम क्रोध मद मच्छर यांचा त्याग यांचि नांवे संन्यासु आति ' एवं षड्विकार त्यागावाचून संन्यास घेणे व्यर्थ होय. संन्यासानंतरही ' इहामुत्र फलोपभोगादि विरागो वैराग्यं ' असा सूत्रपाठामध्ये उपदेश आहे ना ! तर असें तत्व सनातन धर्मास विध्वंसक की पोषक? हे शांत विचारी सूज्ञांस तेव्हांच कळण्यासारिखे आहेत. मात्र दुराभिमानी मंडळीना त्याचे काय महत्व असो. वच्छहरण—त्याची प्रस्तावना पहावी म्हणजे साधर्म्य विद्वज्जनांचा परस्परें किती निर्व्याज प्रेम असे व त्या प्रेमसंबंधात एकमेकाकडे ग्रंथकर्तृत्वापरस्परे सन्मान देत असत. शिवाय त्या काळीं किती तरी विदुषीया असत. व त्यांचा सन्मान राखला जात असें.

आपण काश्मीरावलोकनार्थ गमन करणार तरी कांही मंडळीच्या भेटि अवश्य घ्याव्यात. त्यांनाही पत्रद्वारे सूचना देत आहो.

पत्ता—चौंक पासियांके. जयकृष्णियोंके ठाकूर द्वारेमें. महंत भास्कर बाबाजी अमृतसर व त्याच स्थली महात्मा—मुरलीधर शास्त्रीजी या विद्वान महात्मयाची भेट घेणें. व मठांतील मंडळीचे ग्रंथावलोकन करणे—या मठांत पंजाबी कवितेचा नमुना बराच दृग्गोचर होण्यासारिखा आहे. व महाराष्ट्र संस्कृत हिंदी ग्रंथहि असावीत. नं. २ लंगेमंडी-भगत नंदलाल के ठाकूर द्वारा—लाहोर(अमृतसर)तेथील महंत साधराज हे आहेत. व त्याच मठांत महात्मा जयंतराज हे जर असतील तर काही ग्रंथें तुम्हास मिळतील. पाहावयास व लाहोर येथे आणिक दोन मंदिर या धार्मिकांचे आहेत. पण त्यापैकी—मोर्चा दर्वाजाकडील मंदिरांत महंत आराध्ये महानुभाव ते जर असले तर ग्रंथ पाहावयांस मिळतील व ते स्वत: विद्वान आहेत व धार्मिक आहेत.

जेलम——महंत शार्ङ्गधर महात्मा—मंदिर श्री सावली मूर्ति या पत्यावर जाणे. ते विद्वान असून वक्तेही आहेत. त्यांचे जवळ ग्रंथें पहावयास मिळतील.

हरिपुर——जि. हजारा—येथे संस्कृत विद्यालय आहे. विद्यार्थी मंडळी आहे व त्यांचे मुख्य अध्यापक अति उत्तम सद्गृहस्थ आहेत. ते सारस्वत ब्राह्मण आहेत, त्यांनी विद्यार्थी मंडळी करिता ग्रंथसंग्रहालय करण्याचा उपक्रम आरंभिलेला आहे आणि तेथील धनिक सद्भक्त मंडळीचा दुकानां काश्मीर=श्रीनगर येथे आहेत. व त्यापैकी काश्मीर कांउन्सलांत त्याचा प्रवेशही आहे. या सर्वांच्या ओळखी करणे आपणांस सुगम आहेत. जय कृष्णियोंका—श्रीकृष्ण मंदिर—हरिपुर-यंदा ता. ४—५—२५ पासून शास्त्री परिक्षेस बसणारे ४ महात्मापैकी—महात्मा बाळकृष्ण कवीश्वर यांची सर्वतोपरी तेथे असल्यास मदत होईल—नसल्यास आणिक महात्मे जे असतलि ते व्यवस्था ठेवतलि.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पेशावर–श्री गोपाल मंदिर अंदर शहर–या मठांत कोणी महात्मा आहे की नाही हे सांगता येत नाही. कारण तेथील महात्मा फिरतीवर असण्याचे पत्र आले होते. जर ते आले असतील तर त्यांचे नाव शार्ङ्गधर बुवा. हे महाराष्ट्र असून मनामिळाऊ आहेत व मंदिराच्या व्यवस्थापक दोघी भगिनी वडील गौरजादेवी व धाकटी विलासवंती त्या बहिणी किती भक्तितत्पर शीलसंपन्न श्रीभगवद्गीताप्रेमी आहेत ते पाहिल्यांस समजैल. धाकट्या बहिणीजवळ आमच्या ग्रंथकपाटाच्या किल्ल्या आहेत. तेथील ग्रंथ पहावयास मिळतील. त्यापैकी बरेच ग्रंथ कोणी कोणी वाचावयास नेले ते पुन्हा आले नाहीत. या खेरीज दुसराही एक श्रीकृष्ण मंदिर आहे व त्यांत कांही हिंदी ग्रंथ पाहावयास मिळाले असते पण सध्या तेथील अधिकारी फिरतीवर आहेत असे नुकतेच समजले आहे.

या खेरीज मठे ते रेलवे पासून लांब आहेत. हरिपुरास जर का महात्मा हरिराज मुसाफिर यांना बोलाऊन त्यांची गांठ पडेल तर उत्तम होईल. त्यांचा तो सर्व प्रांत परिचयाचा आहे व ग्रंथसंग्रहालय त्यांचा जवळ आहे. ते प्रेमाने दाखवितीलही. परंतु तुम्हास तरी वेळ किती मिळणार ? सदरील पत्ते रेलवे स्टेशनाचे लिहले आहेत. व रावळपिंडी तुळसाबाईचा पत्ता तुम्हास आहेच. व सर्व मठ महंताना आम्ही पत्रे लिहितो.

आपले ११ रु. आम्हांकडे ज्ञानकोशाबद्दल आहेत ते भेटीवर देऊ–ठीक ठिकाणाहून पत्र देत असावे. परमात्मा आपला संकल्प निर्विघ्नपणे पार पाडो अशी आमची अखंड प्रार्थना आहे.

कवि–काव्य–सूचीसंबंधी लिहिलेल्या चार ओळी त्या कोणा तरी पत्रांत प्रसिद्ध करण्याचे कराल काय ? व आपण लिहलेला निबंध तो छापून प्रसिद्ध कधी होणार ? त्याविषयी कळवाल काय ? निबंध छापून त्याच्या प्रति जर या प्रवासांत समागमे नेल्या असत्या तर अतिशय अमच्या मंडळीत उपयोग झाला असता. पण आता त्या विषयी लिहणे ते काय ? कविकाव्यसूची आणि वच्छहरण यांचा स्वीकार करावा. क. लो. अ.

रा. रा. जयवंतराव ऑनररी मॅजिस्ट्रेट यांना आशीर्वाद सांगावे.

माहूर
१७–४–२५

महात्म वाङ्मय सेवक
महंत दत्तराज कवीश्वर महानुभाव

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्हि न्सें ट व्हॅ न गॉ ग

एक दुर्दैवी महान् कलावंत

शेतांतील काम संपवून परतणाऱ्या लोकांकडून काही तुटक बातमी समजली. पण तिच्यावरून खरा अर्थबोध होईना. म्हणून गांवांतील काही लोक काय गडबड आहे हें शोधून काढण्यासाठीं निघाले. शेतांत पोंचल्यावर त्यांनी पाहिलं – मातीच्या एका कच्च्या ढिगाऱ्यावर व्हिन्सेंट पडला होता. आपल्या छातींत त्यानें गोळी मारून घेतली होती. जमिनीवर, त्याच्या आसपास रक्त सांडलेलं होतं !

लोकांनी त्याला उचलून एका लहानशा हॉटेलांत आणलं. मृत्यूची वाट बघत व्हिन्सेंट शांतपणें पडला होता. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं त्याचा भाऊ थिओ तिथें येऊन पोंचला. थिओला त्यानें सांगितलं–" जगाच्या हितासाठींच मीं हें असं केलं ! "

——अशा विचित्र तऱ्हेनें स्वतःचा मृत्यु ओढवून आणणारा व्हिन्सेन्ट व्हॅन् गॉग्, हा हालंडच्या भूमीचा एक सुपुत्र होता. त्याचं सारं आयुष्य दुःखमय स्थितीत गेलं. जीवनांतील आनंद त्याने कधीच लुटला नाही. चित्रकलेचा तो चाहता नि सेवक होता. पण जिवंत असेपर्यंत त्याच्या कलेचं कधीं चीज झालं नाही! अनु

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणूनच आयुष्यभर त्याच्या जीवाचा कोंडमारा झाला होता. त्याचा परिणाम आत्महत्येमध्यें दिसून आला !

व्हिन्सेंटचं बालपणच काय तें सुखांत गेलं. बाकी—आयुष्यभर निराशाच त्याच्या पदरीं येत गेली. दुर्दैवानें वयाच्या १६ व्या वर्षी त्याला नोकरी करावी लागली. कामानिमित्त लंडन, पॅरिस, वगैरेसारख्या मोठमोठ्या शहरीं तो राहिला आणि ह्याचा फायदा घेऊन त्यानें आपल्यामध्यें वसत असलेल्या कलेचा विकास घडवून आणला. लंडनमधील सर्व म्यूझियम्स त्यानें लक्षपूर्वक अभ्यासिले आणि निरनिराळ्या चित्रशाळांमध्यें जाऊन त्यानें चित्रकलेचं शिक्षण घेतलं. कलेच्या अभ्यासाबरोबरच तो वाचन व अध्ययन करूं लागला.

ह्याच सुमारास तो एका मुलीच्या प्रेमांत सांपडला — तिने त्याला स्पष्ट नकार दिला. व्हिन्सेंटच्या मनावर फार मोठा आघात झाला. दारुण निराशेच्या ह्या पहिल्या फटकाऱ्यामुळेंच त्याचं मन — धर्म — अध्ययन व तत्त्वज्ञान असल्या गंभीर विषयाकडे वळूं शकलं असं म्हणतात !

मनाच्या विचित्र अवस्थेंतच तो पॅरिसला पोंचला व रात्रंदिवस बायबलचा अभ्यास करूं लागला. नोकरीमध्यें त्याचं लक्ष लागेना. अर्थातच कामांत चुका होत. नि ह्याचा परिणाम त्याला नोकरीवरून काढून टाकण्यांत झाला. व्हिनसेंन्ट व्हॅन् गॉग् एक साधा शाळा मास्तर बनला—! पूर्वीच्या निराशेंत जगुं भर पडली. आणि अशा जीवनाचा अनुभव घेत असतांना देखील त्यानें अत्यंत आनंददायक, भावनापूर्ण व मनाला उल्हासित करणारीं सुंदर चित्रं रंगविलीं. खरोखर आश्चर्यच नाही कां ?

निराशा ! निव्वळ निराशा ! ! निराशेच्या लाटा जीवनाच्या होडीला कुठें नेऊन आदळतील, काय नेम ? अशाश्वततेंत वावरणारा व्हिन्सेंट् मायभूमीला परतला. धर्मोपदेशक बनावंसं त्याला वाटूं लागलं. तो अभ्यास करूं लागला. पण आपलं दुर्दैव अजूनही जागरूक आहे ही त्याला कल्पना नव्हती ! तो परिक्षेंत कधीच पास झाला नाही कारण चर्चमधील शिक्षकांच्या व त्याच्या स्वतःच्या विचारांमध्यें नेहमीं मतभेद होत असत. पण एवढं झालं तरी त्यानें हातपाय गाळले नाहीत. बेल्जियममध्यें जाऊन खाणकामगारांबरोबर मिशनरी कामाचं शिक्षण घेण्यास त्यानें सुरवात केली. पण निराशा अजूनही त्याचा पाठलाग करीत होती. त्या प्रदेशांतील शुष्क वातावरण व मजूरवर्गाची करुण अवस्था पाहून त्याचं मन जास्तच उद्विग्न झालं. ह्याच उद्विग्नतेला वाव देण्यासाठीं त्यानें "The Potato Eaters" नांवाचं आपलं सर्वोत्कृष्ट चित्र तयार केलं; ज्यांत त्या मजुरांच्या, दारिद्र्यानें पुरेपुर व्यापलेल्या जीवनाचे पडसाद उमटलेले आहेत ! ह्या भेसूर वातावरणांत राहून चित्रकलेंत मन रमविणारा व्हिन्सेंन्ट् आतां एक निरिच्छ वृत्तीचा योगी बनला. त्यानें आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आणि तिथल्या लोकांप्रमाणेंच कष्टाचं जीवन तो जगूं लागला. त्याच्या वरिष्ठांना त्याचं हें वागणं पसंत पडलं नाही आणि परिणामांती हीही नोकरी व्हॅन् गॉग्ला पारखी झाली !

आतां मात्र त्याला आपलं जीवन अगदींच अर्थहीन वाटूं लागलं. तरीही तो हताश झाला नाही. वांट्याला आलेल्या निराशेबरोबर द्वंद्वयुद्ध खेळण्यासाठीं त्याला जगूं हुरूप आला होता. म्हणूनच की काय यश मिळविण्याचे निरनिराळे मार्ग तो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शोधून काढीत असे. आतां त्यानें ठरविलं -- कलावंत व्हायचं. फक्त कलेची सेवा करायची. त्यासाठीं अव्याहत परिश्रम घ्यायचे! कलावंत बनून तरी आपलं भाग्य. उदयाला येईल नि आपल्या कलाकृतींद्वारें स्वतःच्या नाहीं पण दुसऱ्यांच्या जीवनांत तरी आपण आनंद उत्पन्न करूं शकूं. ही वेडी आशा तो मनाशी बाळगून होता लगेच त्या दिशेनें त्याचे प्रयत्न सुरू झाले. तो एकचित्तानें अभ्यास करूं लागला.

कांही दिवसांनीं तो आपल्या पित्याच्या घरीं आला. उत्साहानें काम करण्यास सुरुवात केली असली तरी त्याच्या मनाची उद्विग्नता पार मावळली नव्हती. त्याला वाटलं – पित्याच्या घरीं गेल्यावर आपल्या मनाला थोडा विरंगुळा मिळेल; नंतर आपल्याला ज्यास्त उत्साहानें कलेची सेवा करतां येईल.

पण विधिघटना निराळीच होती. पितृगृही आल्यानंतर तो पुन्हा प्रेमपाशांत अडकला - मोहवश झाला! प्रेमभंगाचा आघात पुन्हा एकदां त्याच्या मनावर आदळला. पूर्वीच्याच जखमेवर मीठ चोळलं गेलं! उद्विग्नतेचं गाठोडं बरोबर घेऊन तो तात्काळ हेग् येथें निघून गेला.

पण ह्या वेळीं त्याला स्त्रीच्या सहवासाची इतक्या तीव्रतेनें गरज भासली कीं त्यानें एका वेश्येला आपल्याजवळ ठेवलं. पण तेंही समाधान त्याला ज्यास्त दिवस लाभलं नाही. नात्याची माणसें व मित्रपरिवार यांच्या इच्छेवातर तिला सोडून देणं त्याला भाग पडलं!

पुन्हां तो एकस्या जीवनाचा अनुभव घेऊं लागला. पण प्रेमाच्या बाबतींत घडलेले प्रसंग मनःपटलावरून पुरतेपणीं पुसले जात नाहीत तोंच प्रेमभंगाचा तिसरा तडाखा त्याला बसला. त्याच्यापेक्षां वयानें वडील असलेल्या या स्त्रीबरोबर विवाह करण्यास दोन्ही पक्षांकडून विरोध होता.-अन् म्हणूनच केवळ, त्या स्त्रीनें आत्महत्या करून स्वतःची जीवन-ज्योत विझवून टाकली—!

बिचारा व्हिन्सेंट्! एकला, निराधार, दुर्दैवी व्हिन्सेंट्!! निराशेनें त्याचा पूर्णपणें पराजय केला होता आणि त्याच्याकडे पाहून दांत विचकून जणुं ती हंसत होती! तिनेंच जणुं पुन्हां व्हिन्सेंटला चालना दिली. तो कलेची सेवा करूं लागला. अव्याहत परिश्रम घेऊं लागला. ह्या गोष्टींचा नि मानसिक असमाधानाचा परिणाम त्याच्या प्रकृतिवर झाल्यावाचून राहिला नाही. तरीही मॉनेट्, गॉगीन्, पिसॅरो ह्यासारख्या मोठमोठ्या कलावंतांच्या त्याने भेटी घेतल्या. गॉगीनच्या सहवासांत त्याने कांही दिवस काढले. परंतु लवकरच त्या दोघांचं पटेनासं झालं. तसं पाहिलं तर व्हिन्सेंटचं आयुष्यांत कोणाशींच कधीं पटलं नाही. दैवाबरोबर झुंज खेळत त्याने आपलं सारं आयुष्य एकटेपणानं काढलं. त्याला सहचारिणी लाभली नाही. त्याला प्रेम मिळालं नाही. त्याला मित्रही मिळाला नाही जिवाभावाचा! फक्त त्याचा भाऊ थिओ हा एकच त्याला प्रिय होता. थिओला सतत पत्र लिहून त्यानें स्वतःची कर्मकहाणी रेखाटून ठेवलेली आहे!

व्हिन्सेंटनें कांही दिवस थिओच्या सहवासांत घालविले. पण त्याची प्रकृति फारच खराब झाली होती. अन् म्हणून तो दक्षिण फ्रान्समध्यें जाऊन राहिला. त्यावेळीं त्याचं मनही फार चिडचिडं झालं होतं व तो कित्येकदां विचित्रपणाचं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्तन करी. असाच एकदां त्यानें आपला कान कापून काढला होता असं म्हणतात !

पुढें तो पॅरिसच्या उत्तरेला असलेल्या खेड्यांमध्यें जाऊन राहिला. त्या सुमाराला उत्पन्न केलेली कलाकृती त्याचं नांव जगांत अमर करती झाली. (rows over the wheat field) ही त्याची अखेरचीच कलाकृती ठरली. मनातील विचार आणि भावनावेग असह्य झाल्यामुळें म्हणूनच की काय तो एक दिवस खेड्यातील शेतांतून हिंडूं लागला.

—आणि सायंकाळीं काम संपवून परत फिरणाऱ्या शेतकऱ्यांकडून गांवांतील लोकांना समजलेली तुटक बातमी खरी ठरली. व्हिन्सेंटनें स्वतःच्या हातानें स्वतःलाच गोळी मारून घेतली होती. पण जगाच्या हितासाठींच त्यानें असं केलं होतं ! व्हिन्सेंटच्या आत्महत्येमुळें जगाचं काय हित झालं कोण जाणे ! पण एका उत्कृष्ट कलावंताला तें कायमचं अंतरलं एवढी गोष्ट खरी !

ह्या क्षणानंतर जगाने व्हिन्सेंट व्हॅन् गॉगला डोक्यावर घेतलं. त्याच्या कलाकृतींची पूजा केली. पण अखेरच्या क्षणापर्यंत उदासीन मनःस्थितींत राहिलेल्या त्या जीवाला समाधानाचा श्वास टाकणं तरी शक्य झालं का !

संपादकांचें निवेदन

युगवाणीच्या चालू अंकाच्या संपादनाची जबाबदारी कार्यकारी मंडळानें मजकडे सोंपविल्यावर हा अंक संकल्पित वेळेच्या आंत काढण्यास पुरेसा अवधि नव्हता. त्यामुळें हा अंक वाचकांस उशिरा मिळत आहे, पण तसें होणें अपरिहार्यच होतें.

या अंकांत संमेलनवृत्त, राजभाषा अधिनियमाबद्दल वि. सा. संघानें केलेलें कार्य व शुद्धलेखन-समितीच्या सूचना, त्याचप्रमाणें परीक्षांचे निकाल दिले आहेत. राजभाषा अधिनियमाबद्दल संघानें स्वीकारलेल्या भूमिकेबद्दल कांही गैरसमजावर आधारलेली टीका कांही वृत्तपत्रांनीं केली आहे. त्याबद्दल अधिक सविस्तर लिहिण्यापूर्वी संघाची भूमिका आणि संघानें त्या बाबत केलेल्या खटपटींची सविस्तर माहिती मराठी भाषिकांपुढें ठेवणें जरूर वाटलें व म्हणून तें सबंध प्रतिवृत्त या अंकांत दिलें आहे. वरील मजकूर दिल्यानंतर जागेच्या अभावी इतर मजकूर देता आला नाहीं. पुढील अंकापासून वाचकांस विविध प्रकारचा मजकूर सादर करण्याचा प्रयत्न करूं.

संपादक मंडळांत राहून श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. गो. रा. दोडके व श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनीं युगवाणीच्या संपादनांत साहाय्य देण्याचें कबूल केलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

—संपादक 'युगवाणी'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्यसंमेलनाचे ठराव

विदर्भ-साहित्यसंघाचें १५ वें अधिवेशन गुरुकुंज-मोझरी येथे ता. १३, १४ व १५ मार्च १९५३ रोजीं भरलें. त्या वेळीं ता. १५ मार्च रोजीं भरलेल्या खुल्या अधिवेशनांत खालील ठराव सर्वानुमतें मंजूर झाले—

दिवंगतांबद्दल दुखवटा

[१] पुढील व्यक्तींच्या निधनाबद्दल विदर्भ-साहित्यसंघाचें हें संमेलन शोक प्रकट करीत असून, त्यांना सद्‌गति मिळो, अशी प्रार्थना करीत आहे.

[१] श्री. बा. ना. सहस्रबुद्धे, [२] म. म. कृष्णशास्त्री घुले, [३] श्री. विनायकराव ऊर्फ नानासाहेब गर्गे, [४] श्री. नानासाहेब मोहगांवकर, [५] श्री. बापूसाहेब इडस व [६] श्री. सुरेशबाबू माने.

[ठराव अध्यक्षांकडून]

त्रैवार्षिक योजना

[२] विदर्भ-साहित्यसंघाची योजनाबद्ध प्रगति घडवून आणण्यासाठीं संघाची एक त्रैवार्षिक योजना तयार करण्यांत यावी. इतर सर्व बाबतींबरोबरच वि. सा. संघाच्या द्वारा उच्च दर्जाचें संशोधनकार्य आणि सामान्य जनतेंत ज्ञानप्रसाराचें कार्य चालू व्हावें व भारताच्या पंचवार्षिक योजनेंतील सांस्कृतिक व शैक्षणिक बाबींना वि. सा. संघानें आपल्या उद्देशानुसार शक्य त्या मार्गांनी साह्यभूत व्हावें हीं उद्दिष्टें प्रामुख्याने डोळ्यांपुढे ठेवून ही त्रैवार्षिक योजना आखण्यांत यावी. ही योजना शक्य तितक्या लवकर आंखून तीं कार्यान्वित करावी अशी या संमेलनाची कार्यकारी मंडळास शिफारस आहे. या योजनेनुसार जें कार्य होईल त्याचा संपूर्ण अहवाल तिच्या कालमर्यादेनंतर प्रसिद्ध करण्यांत यावा.

सूचक—श्री. वि. गंधे
अनुमोदक—ना. क. तांबी

पारिभाषिक कोश

[३] मध्यप्रदेशाचा राज्यकारभार व सरकारी कामकाज हिंदी व मराठी या प्रादेशिक भाषांतून चालविता यावें या उद्देशानें परिभाषेच्या इंग्रजी-हिंदी व इंग्रजी-मराठी कोश बनाविण्याचा उद्देश मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनी जाहीर केला आहे; व त्याप्रमाणे कार्यहि सुरू झालें आहे. त्याबद्दल हें संमेलन त्यांचें अभिनंदन करीत आहे.

वस्तुतः परिभाषेचा प्रश्न केवळ प्रादेशिक स्वरूपाचा नसून तो अखिल भारतीय व आंतरप्रांतीय स्वरूपाचा आहे, व त्यामुळें हें कार्य खरोखरीच भारत-सरकारमार्फत व्हावयास पाहिजे; व त्यास अखिल भारतीय व आंतरप्रांतीय मान्यता असणें जरूरीचें आहे.

परंतु, म. प्र. राजभाषा अधिनियम १९५० ची अंमलबजावणी करण्याचे हेतूने सध्यापुरते हें कार्य या प्रदेशापुरतेच करावयाचें असलें, तरीहि मराठी भाषेमध्यें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेल्या तीन चारशे वर्षांच्या परंपरेमुळें पुष्कळ राज्यकारभाराविषयक शब्द रूढ होऊन ते जनतेच्या तोंडीं खेळत आहेत. कित्येक शब्दांचा मूळ उगम एकच असला, तरी हिंदी व मराठी या दोन भाषांत त्यांची रूपें भिन्न झालीं आहेत. मूळ प्रकृतीपासून साधित शब्द बनविण्याच्या या दोन भाषांच्या प्रक्रिया भिन्न आहेत. शिवाय हिंदी आणि मराठी या दोन भाषांचें या राज्यात बरोबरीनें स्थान आहे व राहील अशी मुख्य मंत्र्यांनी अनेकवार घोषणा केली आहे. या सर्व कारणास्तव इंग्रजी-मराठी पारिभाषिक कोश मराठी सहाय्यकांकडून मराठी विद्वानांच्या देखरेखीखाली स्वतंत्र रीतीने बनविण्यांत यावा, अशी या संमेलनाची मागणी आहे. हें संमेलन पुढे असेंहि सुचविते कीं, अशा तऱ्हेने स्वतंत्रपणें बनविण्यांत येणारा इंग्रजी-मराठी कोश वि. सा. संघाचे सहकार्याने तयार करण्यांत यावा.

या संबंधांत वि.. सा. संघाच्या अध्यक्षांनी वेळोवेळीं सरकारला जीं निवेदनें केलीं आहेत, त्यांना या संमेलनाचा पाठिंबा असून त्यांत निर्दिष्ट केलेल्या कार्य-पद्धतिव्यतिरिक्त इतर रीतीनी तयार केलेला कोश वि. सा. संघाला मान्य होणार नाही, असें हें संमेलन जाहीर करूं इच्छितें.

सूचक–श्री. ना. बनहट्टी
अनुमोदक–गो. बा. पुल्लीवार

महारोग्यांच्या जीवनाचा अभ्यास

[४] भारतांत व त्यांतल्या त्यांत विदर्भात महारोग्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने समाजापुढे हा एक भयानक प्रश्न उपस्थित झाला आहे

महारोग्यांविषयीं विचित्र अशा गैरसमजुती पसरलेल्या असल्याने समाज ह्या लोकांकडे तिरस्कारानें पहात असतो. त्यामुळे त्यांच्यावर अमानुष असे अत्याचार होत असतात. महारोग झालेल्या लोकांची स्थिति किती अनुकंपनीय होते व त्यांतल्या त्यांत स्त्रियांचें जीवन किती असह्य होतें, ह्याची जाणीव सामान्य लोकांना नाही. त्यामुळे अशा लोकांना स्वाभिमानानेच नव्हे तर मनुष्य म्हणून जीवन कंठणेहि अशक्य झाले आहे.

साहित्यिक, कलाकार व कवि या लोकानी ह्यापुढे तरी महारोगी लोकांच्या दयनीय व दुःखद जीवनाचा अभ्यास करुन, समाजाला आपल्या कर्तव्याची जाणीव करुन द्यावी, अशी या परिषदेला विनंती आहे.

सूचक–डॉ. शिवाजीराव पटवर्धन
अनुमोदक–पु. य. देशपांडे

राजभाषा अधिनियम

[५] मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५० मध्ये कांही दोष असल्यामुळे मराठी भाषेला प्रत्यक्ष व्यवहारांत गौणत्व व दुय्यम स्थान प्राप्त होणारे असून त्यामुळे मराठीवर व मराठी भाषिकांवर मोठा अन्याय झालेला आहे.

हा दोष व अन्याय दूर व्हावा म्हणून या अधिनियम–दुरुस्तीचें विधेयक कांही मराठी आमदारांनी विधानसभेंत मांडण्यासाठी पाठविलें आहे. तसेंच याबाबत आपली भूमिका स्पष्ट करणारें निवेदन वि. सा. संघातर्फे मुख्य मंत्र्यांना सादर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्यांत आलेल्या निवेदनास व ५ मराठी आमदारांनी पाठविलेल्या म. प्र. राजभाषा-अधिनियमाच्या मसुद्यास हें संमेलन मान्यता देत असून, म. प्र. सरकारला अत्यंत कळकळीची व आग्रहपूर्वक विनंती करतें कीं, राज्यसरकारने विधानसभेच्या चालू अधिवेशनांतच हें दुरुस्ती बिल स्वतः सरकारतर्फेच मांडावें व तें मंजूर करवून घ्यावें. वि. सा संघाच्या निवेदनांत राजभाषा अधिनियमाच्या कलम नं.३ व ४ मध्ये सुचविलेल्या सर्व दुरुस्त्या मंजूर केल्यानेच मराठीवर होत असलेला अन्याय दूर होणार असून तिला तिचें न्यायाचें स्थान प्राप्त होणारें आहे.

सूचक—पु. य. देशपांडे
अनुमोदक—के. दे. देशपांडे

राजभाषा अधिनियमासंबंधी प्रचारसमिति

[६] मध्यप्रदेशराजभाषा अधिनियमाची अंमलबजावणी ता. १५ ऑगस्ट १९५३ पासून सुरू होत आहे. ती सुरू होण्यापूर्वीच वरील अधिनियमांत आवश्यक त्या दुरुस्त्या घडवून आणण्यासाठी एक दुरुस्तीबिल वि. सा. संघाच्या प्रयत्नांनी ५ आमदारांनी विधानसभेकडे पाठविलें आहे. तें मंजूर करवून घेण्याच्या दृष्टीनें, तसेंच परिभाषेच्या प्रश्नासंबंधी योग्य तो निर्णय सरकारने घ्यावा म्हणून, सीमेवरील मराठीवर होणाऱ्या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठी लोकमत, जागृत प्रभावी व संघटित होणें आवश्यक आहे. या दृष्टीने हें संमेलन नागपूर व विदर्भ प्रादेशिक कांग्रेस कमिट्या, सर्व राजकीय पक्ष, मध्यप्रदेशांतील मराठी विभागांतील सर्व तऱ्हेच्या सार्वजनिक संस्था, कार्यकर्ते व आमदार यांना अशी विनंती करते कीं, त्यांनी विदर्भ साहित्यसंघातर्फे वरील प्रश्नासंबंधी करण्यांत आलेल्या मागण्यांना आपला पाठिंबा जाहीर करावा.

हें संमेलन उपरोक्त प्रश्नासंबंधी प्रचारात्मक कार्य सतत करण्यासाठी खालील सभासदांची एक उपसमिति नियुक्त करीत आहे.

[१] श्री. ना. रा. बामणगांवकर—आमंत्रक; [२] श्री. पु. य. देशपांडे, [३] श्री. ए. श्री. पटवर्धन, [४] श्री. प्रभाकर उर्ध्वरेषे, [५] श्री. ना. खं. तिरपुडे, [६] श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व [७] श्री. बाळासाहेब ढवळे.

या समितीस आणखी २ सभासद नियुक्त करून घेण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

सूचक—द. शं. फडके
अनुमोदक—रा. पु. सगदेव

प्राथमिक शिक्षणाची पुनर्घटना

[७] स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय गणराज्याची जी राज्यघटना अमलांत आली, तींत दहा वर्षांच्या आंत सर्व देशांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें आणि मोफत करण्याचा आदेश देण्यांत आला आहे. पण आज जो प्राथमिक शिक्षणाचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभ्यासक्रम देशांत प्रचलित आहे, तो खेडुत जनतेच्या आर्थिक, सामाजिक आणि नैतिक विकासाला कोणत्याहि प्रकारें पोषक नसून उलट त्या जीवनात कृत्रिमता उत्पन्न करणारा आहे, असा शिक्षणशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. म्हणून प्राथमिक शिक्षणप्रसाराची योजना अमलांत आणतांना ग्रामीण जनतेची मनोवृत्ति, परिस्थिति आणि गरजा या लक्षांत घेऊन ग्रामीण जीवनाला पोषक असा अभ्यासक्रम आणि उपयुक्त असें सुबोध वाङ्मय प्रथम तयार करण्यांत यावें, अशी या संमेलनाची सरकारला विनंती आहे.

आज मराठी भाषेंत ग्रामीण जनतेच्या विकासाला पोषक असें वाङ्मय फारसें उपलब्ध नाही ही गोष्ट लक्षांत घेऊन मराठी साहित्यिक आणि पत्रकार यांनी ग्रामीण जनतेला सहज समजेल असें साहित्य निर्माण करून तिच्या जीवनाला नवीन वळण देण्याचा प्रयत्न कळकळीने करावा, असें मराठी साहित्यिक आणि पत्रकार यांना आवाहन आहे.

सूचक—के. ब. कदम
अनुमोदक—शं. रा. लोंढे

भूदानयज्ञाचा पुरस्कार

आचार्य विनोबा भावे यांनी गतवर्षीच्या विदर्भ-साहित्यसंमेलनाला जो संदेश पाठविला, त्या संदेशांत व अन्य प्रसंगीं आचार्य विनोबांनी आपल्या भूदान यज्ञासंबंधी साहित्यिक, कलाकार व वृत्तपत्रकार यांना जें कळकळीचें आवाहन केलें आहे, त्याकडे हें संमेलन सर्व मराठी साहित्यिक, कलाकार व पत्रकार यांचें लक्ष वेधूं इच्छितें. आपापली स्वतंत्र प्रतिभा व स्वतंत्र प्रज्ञा जोपासून साहित्यिक, कलाकार व पत्रकार यांनी, भूदान व संपत्तिदान यज्ञाच्या माध्यमांतून जें एक महान् सांस्कृतिक कार्य आचार्य विनोबांनी आरंभिलें आहे, त्याचें महत्व सर्वसामान्य जनतेला पटविण्याच्या दृष्टीने व जनतेला उत्स्फूर्त करण्याच्या दृष्टीने जें जें करतां येईल तें तें करावें, अशी या संमेलनाची सूचना आहे.

सूचक—ग. त्र्यं. माडखोलकर
अनुमोदक—कु. विमल ठकार
श्रीसंत तुकडोजी महाराज

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शुद्धलेखनसमितीचा वृत्तान्त

[१] १९४६ च्या अकोट-साहित्यसंमेलनाने शुद्धलेखनाच्या प्रश्नासंबंधी आपला अहवाल सादर करण्यासाठी एक शुद्धलेखन समिति नेमली. तिचे आमंत्रक डॉ. शं. दा. पेंडसे असून तिच्या कांही बैठकीहि पुढील वर्षी झाल्या. परन्तु वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांच्या अपमृत्युमुळें पूर्वीचे कागदपत्र गहाळ झाले. म्हणून यंदाच्या अध्यक्षांनी या समितीचे पुनरुज्जीवन करून डॉ. माधव गोपाळ देशमुख यांना आमंत्रक नेमलें. समितीच्या एकूण पांच बैठकी ता. १६ डिसेंबर १९५२ व ता. १९।२०।२१ फेब्रु. व २८ मार्च १९५३ रोजीं झाल्या.

[२] शुद्धलेखनसमितीचे सभासद [१] डॉ. शंकर दामोदर पेंडसे [२] डॉ. यशवंत खुशाल देशपांडे [३] प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी [४] प्रा. हरि नारायण नेने [५] डॉ. विष्णु भिकाजी कोलते व [६] डॉ. माधव गोपाळ देशमुख [आमंत्रक].

[३] पहिल्या, तिसऱ्या व चवथ्या बैठकीस सर्व सभासद उपस्थित होते. पांचव्या बैठकींत समितीचें ज्या ज्या मुद्यांवर अधिकांत अधिक बहुमत होऊं शकते असा एक मसुदा तयार करण्यांत आला. त्यावर डॉ. पेंडसे, कोलते, नेने व देशमुख यांच्या सह्या झाल्या. डॉ. देशपांडे व प्रा. बनहट्टी या बैठकीला हजर राहूं शकले नाहीत.

[४] वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाच्या ता. ५ एप्रिल १९५३ रोजीं भरलेल्या सभेंत हा बहुमताचा मसुदा ठेवण्यांत आला व तो विदर्भसाहित्य-संघातर्फे महाराष्ट्र-साहित्य परिषदेकडे शुद्धलेखनाच्या नव्या नियमांस दुरुस्त्या म्हणून सूचनार्थ पाठविण्यासाठीं कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली.

[५] विदर्भ-साहित्यसंघाच्या अकोट-संमेलनाने नेमलेल्या शुद्धलेखन-समितीच्या बहुमताचा दुरुस्त्यांचा मसुदा पुढीलप्रमाणे—

विदर्भ साहित्य संघाने सुचविलेल्या दुरुस्त्यांसह

शुद्धलेखनाचे नवे नियम

अनुस्वार

१. मराठीमध्ये अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदु द्यावा. उदा० तंटा, चिंच, आंबा.

२. संस्कृतप्रमाणे य् र् ल् व् श् ष् स् ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल मराठींत शीर्षबिंदु द्यावा. उदा० सिंह, संयम, मांस.

३. नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर अनुस्वार द्यावा. उदा० लोकांस, मुलांस, तुम्हांस.

४. वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याहि कारणांसाठी, व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार मराठींत देऊं नयेत.

ऱ्हस्व-दीर्घ

५. शब्दाच्या अन्तीं येणारा इकार-उकार मराठींत नेहमी दीर्घ लिहावा. उदा० पाटी, जादू, पैलू, हळू.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अपवाद [१] आणि, हि, नि, हीं अव्ययें, [२] प्रथमेच्या उभयवचनांतील ऱ्हस्व इकारान्त-उकारान्त तत्सम शब्द. उदा० कवि, गति, गुरु, परंतु, अद्यापि, यथामति.

६. दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त मराठी शब्दांचे उपान्त्य इकार-उकार नेहमी ऱ्हस्व लिहावे. उदा० गरिबी, माहिती, हुतूतू, सुरू.

७. अकारान्त मराठी शब्दाचे उपान्त्य इकार-उकार नेहमी दीर्घ लिहावे. उदा० गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद—ऱ्हस्वोपान्त्य अकारान्त तत्सम शब्द. उदा० गुण, विष, मधुर, प्रचुर.

सामान्यरूप

८. उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या मराठी शब्दांचा उपान्त्य इकार-उकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळीं ऱ्हस्व लिहावा. उदा० गरिबास, वकिलांनो, सुनेला, वसुलीची. अपवाद:—दीर्घोपान्त्य तत्सम शब्द. उदा० जीवास, शरीरास, सूत्रांत, गीतेंत.

किरकोळ

९. 'पूर' हा ग्रामवाचक शब्द कोणत्याहि ग्रामनामाशीं लावतांना दीर्घोपान्त लिहावा. उदा० नागपूर, संबळपूर, तारापूर.

१०. राहणें, वाहणें, पाहणें, हीं रूपें शुद्ध. राहाणें, रहाणें, वहाणें, वाहाणें, हीं अशुद्ध.

११. कोणता, एखादा, हीं रूपें शुद्ध. कोणचा, एकादा, हीं रूपें अशुद्ध.

१२. हळूहळू, मुळमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

१३. विनंती हा तद्भव शब्द दीर्घान्त लिहावा.

१४. शिर, (डोके) या अर्थाचा तत्सम शब्द ऱ्हस्वोपान्त लिहावा.

१५. कठीण, कोन हे तद्भव शब्द तत्सम शब्दांशीं समास करितांना कठिन, कोण असे मुळाप्रमाणे लिहावे. उदा० कठिनोत्तर, त्रिकोण, दृष्टिकोण इ०.

टीप—शुद्धलेखनाचे नियम वरप्रमाणे असावे. तथापि महाराष्ट्र—साहित्य-संमेलनाचे किंवा तत्पूर्वीचे नियम वापरून (म्हणजे त्यांच्या अनुसार अनुस्वार दिल्यास, वा रविकिरणमंडळाच्या पद्धतीप्रमाणे अनुनासिक उच्चारानुसारी उदा० तण्डा, चिन्च, आम्बा, सिंव्ह, मांग्स असें लिहिल्यास, वा ऱ्हस्व इकारान्त-उकारान्त मराठीच्या स्वभावाला अनुसरून दीर्घान्त लिहिल्यास) असें आपलें लेखन कोणी सुसंगत रीतीने केलें तर तें अशुद्ध समजूं नये.

वरील अहवाल मान्य असलेल्या सभासदांच्या सह्या

मा. गो. देशमुख (आमंत्रक व सभासद) — शं. दा. पेंडसे

वि. भि. कोलते

ह. ना. नेने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघ : जानेवारी १९५३ परिक्षांचे निकाल

जानेवारी १९५३ मधलि वि. सा. संघाच्या सर्व परीक्षांना मिळून एकूण ७१५ विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. त्यांपैकी ६४५ विद्यार्थी परीक्षांना बसले आणि त्यांतून ४०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. परीक्षा २४ केंद्रस्थानीं झाल्या. यावेळचा विशेष हा की, मराठी प्रारंभ व साहित्य विनीत या परीक्षांना मराठीतर भाषांचे विद्यार्थी पुष्कळ प्रमाणांत बसले. खामगांव, मोर्शी, वेलोरा, धामणगांव, वरोडा ह्या ठिकाणी ह्या वेळेपासून नवीन केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत.

पारितोषिकें

[१] साहित्य विनीत ह्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत सर्वांत अधिक गुण मिळविल्याबद्दल श्री. प्रभंजन नारायण पिंपळे (जबलपूर) यांना कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक देण्यांत आलें आहे.

[२] साहित्य विनीत या परीक्षेंत हिंदी मातृभाषा असलेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांत सर्वांत अधिक गुण मिळविल्याबद्दल कु. निर्मला राधावल्लभ लड्डा (अमरावती) ह्यांना ब्रजकिशोर मिश्रा पारितोषिक देण्यांत आले आहे.

मराठी प्रवेश

वर्ग १ ला—पहिले पांच गुणानुक्रमें [१] हरी काशीराम अडे [दारव्हा], [२] प्रभाकर विश्वनाथ गोंधळेकर [दारव्हा]; [३] नंदकुमार माधवराव मुदलीयार [दारव्हा]; [४] अर्जुन बालाजी मात्रे [दारव्हा]; [५] कमळाकर रामराव बल्लाळ [दारव्हा]; कु. उषा विनायक गोंधळेकर; कु. देवल मारुती कांबळे; कु. मृणालिनी लक्ष्मणराव जोगळेकर; कु. विजया धोंडोपंत जयपूरकर; कु. शकुंतला गणपतराव चेंटूले.

वर्ग २ रा—जयसिंह लक्ष्मीदास रामैय्या; वीरेन्द्रकुमार पाराशर; अर्जुन नथू कराळे; कमल विनायकराव शेलोडकर; कमल गणपतराव चेटूले; कल्याणजी लीलाधर खेराजगाला; किसन चंपतराव चेटूले; कुमुद अच्युतराव दांडेकर; चंद्रकान्त बळिराम तोटे; झुल्फेकारखा महबुबखां; कु. नलिनी पुंजाजी नवरे; प्रकाश सखाराम लाभसेटवार; कु. सुमन लक्ष्मण घोटकर; अरुण घोष; हरकिशोर अग्रवाल; कृष्णदास नारायण मामणकर; ठकसेन डोमाजी राजणहिरे; प्रभाकर तानबाजी घोपटे; रामचंद्र बाजीराव निखाडे; रामजी राघोबा गोंडे; शरद्चंद्र वासुदेवराव फडणवीस; शामराव पांडुरंग माहुलकर; वृजभानसिंह चौहान.

वर्ग ३ रा—रामविलास मुरलिधर वर्मा; रामावतार ऋषीरामजी शर्मा; सत्यनारायण दुर्गादत्त अग्रवाल; कु. बायडी बळिराम काळबांडे; बबन उत्तमराव ठाकरे; बाजीराव आत्माराम एकरे; मधुकर पांडुरंग थूटे; माधव जागो गंदरे; रामा दशरथ ठोंबरे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी प्रारंभ

वर्ग पहिला:—पहिले तीन गुणानुक्रमें:—[१] सतीश हरिहरराव घोडे [धामणगांव] [२] रामचंद्र महादेवराव जोशी [भंडारा] [३] मुकुंदा इशोरा शिवनकर [भंडारा]

वर्ग २ रा:—गोविंदा लट्टू घोडीचोर; रामेश्वर चैनसुख अग्रवाल; भाऊराव तुळशीराम देशमुख; मनोहर त्रिंबकराव हेरडे; कु. निर्मला विष्णुपंत पेंढरकर; विजय अनंतराव नाफडे; अण्णा सखाराम पिंदुरकर; उदितनारायण भगवानुदीन शुक्ला; मालती लक्ष्मण जीवतोडे; शांताराम गोविंदराव आस्कर.

वर्ग तिसरा:—वासुदेव भाऊरावजी जवंजाळ; कु. कुसुम लक्ष्मणराव देशपांडे; चंद्रशेखर गुंडाराम रामटेके; दिवाकर तेजरामजी भुरे; पुरणलाल दशरथ वासानिक, कु. प्रमिला दिनकरराव पेंढारकर; विनायक जगन करंभे; अशोक नारायण पुरेकर; रामप्रकाश शिवप्रताप लड्ढा; हरीराम सखाराम बाहे; चंद्रशेखर पुरुषोत्तम पांडे; त्र्यंबक चिंधाजी वानखडे; रामभाऊ नथूजी तायडे; शरचंद्र नारायण कीर्तने; सुकदेव सोनाजी वानखडे; सौ. आशा अमरचंदजी जैन; प्रभाकर त्र्यंबकराव खेडकर; कु. मालती सुंदरपंत सराफ; नारायण लक्ष्मणराव मालखेडे; कु. शालिनी शामराव चौधरी; उद्धव बालाजी आंबाडे; केशव रामाजी लोहकरे; कृष्णा बाजीराव ठाकरे; गोविंदा विठोबा खामनकार; जगन्नाथ महादेव मानुसमारे; जनार्दन काशीनाथ बरडे; तुकाराम कृष्णराव थुटे; तात्याजी कृष्णाजी ढवस; देवराव फकिराजी कुंभारे; धरमचंद फुलचंद मोदी; नागोराव श्रावण डोये; नारायण पर्वतराव वरखडे; पुंडलीक विठोबाजी जानवे; बालाजी शीतराजी शेटे; भाऊराव मारोती लांजेकर; भाऊराव मारोतराव वाभिटकर; भानुदास नारायणराव फरसुले; मालचंद्र दादाजी ठाकरे; भास्कर मारखंडी डोंगरवार; मधुकर विनायकराव पोहणकर; मनोहर विठ्ठल डुकरे; महादेव लटारी मत्ते; महादेव विठ्ठल मोजे; महादेव विश्वनाथ देठे; रघुनाथ नारायण जोशी; रमणभाई गोविंदभाई पटेल; रामभाऊ राजेश्वर बच्चूवार; राजेश्वर कृष्णाजी गोगुलवार; रामभाऊ हरी-रामजी बिंगेवार; रामराव नामदेवराव मत्ते; वसंत कृष्णराव पिंपळापुरे; वसंत बापुराव गादेवार; वामन रुधाजी मत्ते; वासुदेव सांबाजी माटे; विठ्ठल भगवान कापसे; विश्वनाथ जयराम खंगार; शामराव गणपतराव मुसारी; शेख युसुफ शेखशरीफ; श्रीहरी विठोबाजी घोंडगे; कु. सुमन श्रीधरपंत केळापुरे; सेखपापा वल्द सेख इब्राहीम; कु. इन्दू शामराव कापगते; भरतलाल रामकिसन गुप्ता; व्यंकटेश अंताराम राऊत; शिवलाल सुकल राऊत.

साहित्य विनीत

वर्ग १ ला:—पहिले पांच गुणानुक्रमें (१) प्रभंजन नारायण पिम्पळे [जबलपूर]; (२) मधुकर लक्ष्मण अंभोरकर [भंडारा]; (३) सुरेशचंद्र दामोदर अन्नदाते [कारंजा]; (४) सौ. निशा मधुकर चाकणकर [जबलपूर]; (५) मधुकर काशीराव इंगळे [मोर्शी]; कु. पुष्पा काशीनाथ ब्रह्म; कु. प्रमिला विनायक धरणगांवकर; कु. सिंधु एकनाथ फडणीस; कु. सिंधु सदाशिव सोले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्ग २ राः—कमलाकर विनायकराव वेलणकर; कल्पना पुरुषोत्तमराव हातेकर; काशीप्रसाद भिकाजी साखरदांडे; दत्तात्रय अंबादास गर्गे; कु. नलिनी सखारामपंत गुरलवार; पद्माकर नारायणराव मुडकी; मधुकर गोपाळराव ढोरे लक्ष्मण दत्तात्रय दाऊतखानी; वसंत लक्ष्मणराव शेणवाई; श्रीराम सीताराम गावंडे; कु. उषा रामचंद्र देशमुख; कु. कमल पर्वतराव अघम; कु. कला कृष्णराव वऱ्हाडपांडे; जयन्ती यशवंतराव बाळ; कु. तारा बाळकृष्ण दलाल; कु. निर्मला राधावल्लभ लड्ढा; कु. यमू अभिमानजी सोनोने; विमल यादवराव सारंगपाणी मुदलियार; कु. सुधा कृष्णराव वैसास; कु. सुधा नारायणराव डोंगरे; मदनलाल सुरजमल चांडक; कु. मालती राजाराम ठोकळ; रामकृष्ण रामचंद्र योटे; सुधा विष्णुपंत शिदोरे; गजानन विठ्ठलराव गोडघासे, कु. जसोदा नारायणसिंह परमार; नामदेव तुळशीरामजी राऊत; कु. मालती गोपाळराव मसाळकर; सुधाकर कृष्णराव मनभेकर; संभाजी सदाशिव होकम; सौ. प्रमिला विष्णुपंत भंडारकर; पुंडलिक भिवाजी दुधे; यशवंत रामचंद्र गुल्हाने; हनमंत रंगनाथ गलगलीकर; अनंत शंकरराव सपकाळ; दिनकर दिनाआप्पा सेवलकर; भरत मोतीलाल फुलाडी; रामकृष्ण उत्तमराव निंबाळकर; विजय कृष्णराव दारव्हेकर; शंकर निनु झांबरे; महादेव रामभाऊ परचाके; केशव बाबलाजी राऊत; नारायण वामनराव देशमुख; वसंत शामराव देशमुख; सुखदेव मोतीरामजी निमकर; दिनकर गणपतराव बोधनकर; सौ. लीला बेंबेवाले; गोविंद पर्वतराव नन्नोरे; गोविंद रामकृष्ण पाटील; रामचंद्र कृष्णराव किडीले; लक्ष्मण पांडुरंग मांडवगणे; संतोष चंपतगीर गोसावी; हिंमत नथ्थूजी चव्हाण; कु. सरोज गोपाळराव जोगळेकर; भगवंत सीतारामपंत भागवत; विठोबा मोतीराम डोईजड; नामदेव रामजी करपे; मधुकर गोविंद बाकरे; कु. कुसुम भगवान शेंडे; कु. नलिनी नारायणराव वणीकर; कु प्रमिला देवराव अतकर; भारत झित्रूजी वैद्य; कु. लीला अंबादास देशपांडे; कु सिंधु नारायण नंदनवार; कु. पुष्पा गोविंद ठोंबरे; कु. शान्ता तुकाराम वाकुळकर; कु. कुमुद दौलतराव रोंघे; कु. विमल बळवंतराव देशमुख.

वर्ग ३ राः—कु. उषा त्र्यंकटेश बोधनकर; कृष्णा लक्ष्मण अखिंडे; चंपत पांडुरंग निस्ताने; जगन्नाथ विठ्ठलराव मदनीवाले; दत्तात्रय महादेवराव देशपांडे; दामोदर गोविंदराव इंदुरकर; नाना महादेवराव वानखेडे; पुरुषोत्तम लक्ष्मणराव काटोळे; मनोहर व्यंकटेश गुंडे; कु. मालती गोपाळराव आमठे; कु. मालती व्यंकटेश बोधनकर; वसंत अमृतराव उपाध्ये; सौ. वसुंधरा अनंत पाठक; कु. विमल सदाशिव भालेराव; शरद् मोहनीराज रावदेव; शरद्चंद्र रामचद्र लोथे;श्याम महादेवराव ढोमणे; सुधाकर बाळाभाऊ बल्लाळ, सुरेश गुलाबराव पाटील, सिस्टर रेजीना, कु. आशा दामोदर अनगळ, कु. इंदुमती गोपाळ तळणीकर, कु. सिंधु राजाराम महाजनी, सौ. पुष्पा गजाननराव काकपुरे, सौ. नलिनी नारायणराव कट्टी, सौ. प्रमिला वसंतराव दलाल, सौ. प्रमिला वासुदेव चिखलीकर, श्री. मालती रामचंद्र देशपांडे, कु. सरल नारायण डोंगरे, कु. सोनु रामचंद्र गंगाखेडकर, कु. दुर्गा शामराव जाधव, कु. प्रभा फुलचंद तांबी, कु. मधुमालती बाळकृष्ण पंडित, कु. वासंती माधव करंडे, कु. शालिनी कृष्णराव जोशी, कु. शीला रघुनाथ ब्रह्म, कु. सुधा दत्तात्रय ओक, कु. सुधा शेषराव देशमुख, अण्णा मोतिराव अडसोड, गुलाब बावलाजी उजैनकर, दत्तात्रय

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंबादासपंत महाजन, दिगंबर मारोतीराव महाजन, केशव माधवराव लांडगे, मनोहर शंकरराव पाठक, माणिकराव ओंकारमल अग्रवाल, वसंत रामचंद्र भोंडे, विश्वास मारोतराव म्हाला, शालीग्राम चतुरजी ढोके, उमाकांत वासुदेवराव धर्माधिकारी, केशव रामराव खोटरे, कृष्णा त्र्यंबक डुबे, गोपाळ रामचंद्र देवळे, जगन्नाथ नामदेव ठाकरे, धर्मनाथ मोतीराम उबाळे, दत्तात्रय गणेशराव कुळकर्णी, निळकंठ बाळकृष्ण करंडे, प्राणजीवन लिलाधर संघाणी, पुरुषोत्तम शामराव राजनकर, मधुकर अंबादास आचार्य, मुरलिधर नारायण पाटील, यशवंतराव गणपतराव वानखडे, विनायक वामनराव कुकडे, श्रीराम पुंडलीक पिंपळे, शरद्‌चंद्र माधवराव लांडगे, सुधाकर गंगाराम बहाले, तुकाराम नारायणराव डोळस, वामन नत्थूजी मुडे, नारायण अमरसिंग हलवणे, बालाराम बिहारीलाल चतुर्वेदी, वासुदेव मोतीराम पांडव, कु. विठाबाई वासुदेव आगरकर, कु. शकुंतला मार्तंडराव जाधव, कु. सुमन गोपाळ कांडगे, अर्जुन गंगाराम शुक्ला, दिगंबर रामभाऊ डाखोडे, पंजाब मोतीराव पवार, मधुकर पांडुरंग माहुरकर, रमाकांत दत्तात्रय जोशी, रामराव रघुनाथराव लोहकरे, वामन लक्ष्मणराव उकंडे, विनायक गणपतराव शेरेकार, शरद प्रभाकर बोरीकर, कु. सिंधु केशवराव घोटकर, कु. सिंधु गणेश घोतरकर, कु. सिंधु विष्णुपंत जोशी, धनपाल जयपाल टेंभरे, नामदेव अभिमन रामटेके, कु. इन्दू रामचंद्रराव भुरे, गंगाधर शालीकराम नाईक, टिकाराम मनुजी सेलोकर, धनराम हरीजी लांजेवार, पुरुषोत्तम महादेव साखरवाडे, मदनमोहन पुसुलाल अग्रवाल, कु. मीरा तेजराम भुरे, रामकृष्ण जाधव ढवाले, रामभाऊ आत्माराम रिनके, लक्ष्मीनारायण खेमराज खेडवा, वामन राजारामजी चन्ने, कु. विमल गोविंदराव बकाने, नाना गणपत चौधरी, महादेवराव मल्लिकार्जुन आरणकर, मारुती पांडुसा टाके, गुलाब नारायण चौधरी, प्रभाकर बळिरामपंत जोशी, प्रल्हाद शंकरराव वढे, मधुकर बाळकृष्ण गोखले, राजाबापू मुरलिधर काजळे, राजाराम मारोती खिरोळकर, हरी विश्वनाथ जोशी, कु. प्रभावती विश्वनाथ भावे, शामराव मंगरुजी पेंदे, रामभाऊ देवमणजी चवराटे, प्रभाकर गोविंदराव वडेकर, महादेवराव जगन्नाथजी पवार, वसंत केशवराव खापरे, शरद महादेवराव पिपलापुरे, श्रीधर रामचंद्रराव फुटाणे, माधव नीळकंठ दलाल, जयकुमार भीमराव इंगळे, देवराव चंपतराव वैद्य, पांडुरंग महादेवराव बोंदरे, अविनाश रघुनाथ जोशी, कु. कुमुदिनी भगवान नाफडे, गुलाबसिंह इंद्रसिंह ठाकूर, श्रीनिवास अवधूत कुळकर्णी, प्रल्हाद निनाजी पोलाखरे, नामदेव व्यंकटराव पाटील, शामराव यमाजी नंदनवार, समर्थ माधवराव जोशी, राजेश्वर पैकन्ना जाजमवार, शंकर गणपति चावरे, शामराव राजाराम इंदूरकर, सोनबा विसन भैसारे, नामदेव लक्ष्मणराव देवतारे, पंढरी गोविंदराव कुंभारे, फकिरा भोजबा गहूकार, राजाराम अर्जुनजी टेंभूर्णे, शंकर लक्ष्मण धोंगडी, अरविंद गणपतराव कटाळे, श्री. उषाबाई यशवंतराव गद्रे, दुलीराम विठोबाजी कापगते, कु. पुष्पा रामभाऊ गायकवाड, सुकराम काशीराम कापगते, ईश्वरदास सदाशिव दिवेकर, उत्तम जनार्दन डफळे, एकनाथ मारोतराव हिवसे, केशव बाळकृष्ण पाटणे, चिंतामण गंगारामजी गुंडलवार, देवराव बापुराव ठाकरे, कु. नलिनी गोविंदराव चिखलीकर, नारायण मथुरालाल जोशी, भाऊराव गणबाजी पाजनकर, भिकमचंद शंकरलाल जोशी, वसंत विठ्ठल भोयर, शरद केशवराव गळगटे, शंकर नानाजी वानखडे, कु. शशिकला व्यंकटेश साने, कु. कमल गुलाबराव पाटील.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य परिचित

वर्ग १ ला:—पहिले पांच गुणानुक्रमें (१) रविकांत विठ्ठलराव सूर्यकर (बेलोरा) (२) आनंदराव माधवराव देशमुख (बेलोरा) [३] पुरुषोत्तम अजाबराव बोरखडे [बेलोरा [४] मोतीराम नरसाजी सरोदे [बेलोरा] [५] रमणलाल हेमराज नवगजे (नांदूरा)

वर्ग २ रा:—पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे; अरुण गोपाळराव शास्त्री; मधुकर दत्तात्रय वडे; कु. मालती पां. अलोणी; सौ. कुसुम श्रीधर मांडे; सौ. प्रभावती प्रभाकर पुराणिक; शरद गोविंदराव इंगळे; कु. सुमन लक्ष्मणराव सोमण; कु. कुसुम विश्वंभरराव देशपांडे, सौ. नलिनी नारायणराव पाठक.

वर्ग ३ रा:—सदाशिव नारायणराव पाटील; पद्माकर रामचंद्र सरदेशमुख; कु. उषा गणेश चौधरी, रामभाऊ विठोबा हडप; सौ. सरला पुरुषोत्तम देशपांडे; गजानन शंकरराव ताडे; नामदेव रामचंद्र मुडे; कु. इन्दू गोपाळराव देशपांडे; कु. सुलोचना दत्तात्रय दिवेकर; कु. विमल वामनराव तत्ववादी; कु. विमल गोपाळराव पिंपुटकर, बाळकृष्ण रामचंद्रराव पाध्ये; सौ. कांचनमाला गोविंद वैद्य; सौ. उषाताई कुळकर्णी; कु. शरदिनी भिकाजी धाकस, श्रीकृष्ण पुंडलीकराव कठाळे; वसंत शामराव चौधरी; नारायण शेषराव देशपांडे; सुधाकर सोमप्पाजी भोगलेवार; कु. शैलजा भास्कर कोल्हटकर.

साहित्य स्नातक

वर्ग २ रा:—पहिले पांच गुणानुक्रमें (१) शेषराव गणपतराव बारस्कर;(बेलोरा); कु. उषा नीळकंठ सदाफळ; (चांदा) लक्ष्मण दामोधर पाठक; (वरोडा) सौ. अनुराधा गोविंद पराण्डे (नागपूर) रघुनाथ विश्वनाथ बाळापुरे; (नांदुरा) कु. कालिंदी महादेवराव गोखले; सुखदेव श्रावणसा मांडवगडे; विष्णु शंकरराव ढोले.

वर्ग ३ रा:—कु. विमल गणेश ओगले; कु. प्रमिला सदाशिव देशपांडे; काशिनाथ सोनाजी कोल्हे; त्र्यंबक गोपाळ दुगवेकर; कु. नर्मदा बुले, कु. मालती वारट, कु. कुसुम हनुमंतराव मुळीक; मोरेश्वर वामनराव अभ्यंकर; सौ. राधा श्रीधर हरदास कु. सिंधु महादेव कोलते; हरिहर चंद्रशेखर लाडकर.

उषा कोलते
कार्यवाह, परीक्षा समीति,
वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, एप्रिल १९५३

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ